
३) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कर्मचारी संघटना नाशिक यांचे समवेत दि. १२.१.९८ रोजी झालेली चर्चा.

जा.क्र.आविम/प्रशा/अस्था-२/ ३२३३ /९८
नाशिक - २.
दिनांक - १७ / ३ /१९९८.

आदेश

महामंडळाचे सेवानियम क्र. ५०(सी) नुसार महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्याने कर्तव्यार्थ व्यतित केलेल्या कालावधीसाठी १/११ या दराने अर्जित रजा त्यांच्या खाती जमा केली जाते. तसेच नियम क्र. ५० (एफ) नुसार त्याने केलेल्या सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी २० दिवस याप्रमाणे अर्धवेतनी रजा त्याचे खाती जमा केली जाते. अर्जित व अर्धवेतनी रजेची याप्रमाणे परिगणना करण्याच्या सध्याच्या पध्दतीत राज्य शासनाप्रमाणे बदल करून ती सुलभ करण्याचा प्रश्न महामंडळाच्या विचाराधीन होता. महामंडळ आता असा आदेश देत आहे की, अर्जित व अर्धवेतनी रजा खाती खाली निर्देशिल्याप्रमाणे रजा जमा करण्यात यावी.

(अ) अर्जित रजा

महामंडळाचे सेवानियम क्र. ५० (सी) मध्ये बदल करून त्याऐवजी कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १५ दिवस अशी दोन हप्त्यामध्ये अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात यावी. असे करतांना कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खाती मागील अर्ध्या वर्षाच्या अखेरीस जमा असलेली अर्जित रजा, पुढील अर्ध्या वर्षामध्ये जमा करण्यात यावी. अशा रितीने जमा केलेली मागील अर्जित रजा व पुढील अर्ध्या वर्षाकरीता आगाऊ जमा करण्यात यावयाची अर्जित रजा दोन्ही मिळून २४० दिवस ह्या कमाल मयदिबाहेर जावू नये.

ज्या कर्मचाऱ्याची नेमणूक अर्ध्या कॅलेंडर वर्षाच्या मध्येच झाली असेल त्याच्या बाबतीत त्याची नेमणुक ज्या अर्ध्या कॅलेंडर वर्षात झाली असेल त्या अर्ध्या वर्षामध्ये तो पुढे जेवढी सेवा करण्याची शक्यता आहे अशा प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याच्या सेवेसाठी अडीच दिवस या दराने त्याचे खाती अर्जित रजा जमा करावी. उदाहरणार्थ, एखाद्या कर्मचाऱ्याची नेमणूक १२ मार्च रोजी झालेली असेल तर त्या अर्ध्या वर्षात त्याची सेवा पूर्ण ३ महिने इतकी होईल आणि म्हणून त्याला मिळणारे अर्जित रजा ३ X ५/२ =७ ½ म्हणजेच पूर्णांकात ८ दिवस इतकी होईल . जर त्याची नेमणूक २० एप्रिल रोजी झालेली असेल तर त्या अर्ध्या वर्षातील त्याच्या सेवेच्या पूर्ण महिन्यांची संख्या २ असेल आणि त्याच्या अर्जित रजा खाती २X ५/२ = ५ दिवस इतकी अर्जित रजा जमा होईल.

सध्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत दिनांक- ३१ डिसेंबर, १९९७ रोजी त्याच्या खाती शिल्लक असलेली अर्जित रजा ही १ जानेवारी १९९८ पासून सुरू होणाऱ्या अर्ध वर्षासाठी उघडण्यात यावयाच्या त्याच्या अर्जित रजेच्या नवीन खात्यामध्ये,त्या अर्ध्या वर्षासाठी जमा करावयाच्या आगाऊ अर्जित रजेबरोबर जमा करण्यात यावी. असे करतांना अर्जित रजेचे दिवस अपूर्णांकात येत असल्यास ते दिवस नजिकच्या दिवसाशी पूर्णांकीत करण्यात यावेत.

अशा तऱ्हेने आगाऊ जमा करण्यात येणारे अर्जित रजा अर्जित रजेच्या प्रत्यार्पण (Surrender of Earned Leave) करण्यासाठी जमेस धरता येईल.

एखाद्या कर्मचाऱ्याने कॅलेंडर अर्ध वर्षाच्या शेवटी सुरू होणारी परंतू पुढील कॅलेंडर अर्ध वर्षामध्ये संपेल अशी अर्जित रजा घेतली तर तिचा हिशेब कसा करण्यात यावा हे दर्शविणारी उदाहरणे यासोबतच्या जोडपत्रामध्ये दर्शविण्यात आली आहेत.

ब) अर्धवेतनी रजा

महामंडळाचे सेवानियम क्र. ५० (एफ) मध्ये बदल करून त्याऐवजी कर्मचाऱ्याच्या अर्धवेतनी रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १० दिवस अशी २ हप्त्यामध्ये अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात यावी. असे करतांना दिनांक- ३१ डिसेंबर १९९७ पर्यंत सेवेचे वर्षे पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत पुर्वीच्या नियमानुसार देय झालेल्या २० दिवसाच्या अर्धवेतनी रजेबरोबर दिनांक- १ जानेवारी १९९८ रोजी आगाऊ जमा करावयाची अर्धवेतनी रजा देय होईल.

ज्या कर्मचाऱ्याच्या सेवेचे वर्ष दिनांक - १ जानेवारी १९९७ ते दिनांक ३१ डिसेंबर १९९७ या कालावधीत पुर्ण होत असेल, त्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत दिनांक ३१ डिसेंबर १९९७ पर्यंत त्या कर्मचाऱ्याने,पुर्ण वर्षाच्या खंडीत कालावधीसाठी केलेल्या सेवेच्यां (broken period of completed year of service) प्रत्येक पुर्ण कॅलेंडर महिन्याला ५/३ या दराने अर्धवेतनी रजा त्याच्या अर्धवेतनी रजा खाती जमा करण्यात यावी.असे करताना कर्मचाऱ्याच्या सेवेचे पुर्ण वर्ष महिन्याच्या १५ किंवा त्याअगोदरच्या तारखेस होत असल्यास त्याच्या अर्धवेतनी रजेची परिगणना करण्यासाठी तो महिना पुर्ण धरण्यात यावा.उदाहरणार्थ एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवेचे पुर्ण वर्ष दिनांक- ११ मे १९९७ रोजी होत असेल तर त्याच्या अर्धवेतनी रजेची परिगणना मे १९९७ ते डिसेंबर १९९७ या कालावधीसाठी करण्यात यावी. म्हणजेच त्याची अर्धवेतनी रजा ५/३ X ८ = ४०/३ = १३ ½ म्हणजेच १३ दिवस इतकी होईल.

सध्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या खाती १ जानेवारी १९९८ रोजी खालील प्रमाणे अर्धवेतनी रजा जमा करावी.

(१) १ जानेवारी १९९७ ते ३१ डिसेंबर १९९७ या कालावधीत त्याने पुर्ण केलेल्या वर्षाच्या शेवटी त्याच्या खाती शिल्लक असलेली अर्धवेतनी रजा

अधिक

(२) वरिल परिच्छेद १ (ब) प्रमाणे त्याच्या खाती जमा करण्यात यावयाची खंडीत कालावधीतील अर्धवेतनी रजा.

अधिक

(३)) १ जानेवारी १९९८ पासुन सुरु होणाऱ्या अर्ध वर्षासाठी उघडण्यात यावयाच्या त्याच्या अर्धवेतनी रजेच्या नविन खात्यामध्ये त्या अर्ध वर्षासाठी जमा करावयाची आगाऊ अर्धवेतनी रजा.

असे करताना अर्धवेतनी रजेचे दिवस अपुर्णांकात येत असल्यास ते दिवस नजिकच्या दिवसाशी पुर्णांकीत करण्यात यावेत.

एखादा कर्मचारी कॅलेंडर अर्धवर्षाच्या शेवटच्या दिवशी रजेवर असेल तर तो कर्मचारी रजा संपल्यानंतर कामावर परत रुजु होण्याची वाजवी शक्यता आहे अशी ,रजा मंजुर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तरच पुढील कॅलेडर अर्धवर्षामध्ये अर्जित व अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात यावी.

क) महामंडळाचे सेवानियम क्र. ५० (आय,जी) मध्ये बदल करुन अर्जित रजेची मर्यादा १८० या संखेऐवजी २४० ही संख्या दाखल करण्यात यावी .

वरील आदेश दिनांक १ जानेवारी, १९९८ पासून अंमलात येतील. या आदेशाप्रमाणे रजेचा हिशेब तयार करण्यासाठी सर्व कर्मचा-यांचे दिनांक ३१ डिसेंबर १९९७ पर्यंतचे हिशोब प्रचलित पध्दतीनुसार जानेवारी १९९८ मध्ये पूर्ण करण्यात यावेत.

अधिक माहितीसाठी शासन निर्णय क्रमांक : अरजा.२४८८/३९५/सेवा-९ दिनांक ९ नोव्हेंबर १९९० ची प्रत सोबत जोडली आहे.

स्थळ प्रतीवर मा. व्य.संचालक }
यांची सही असे }

व्यवस्थापकीय संचालक
म. रा.सह. आदिवासी विकास महामंडळ मर्या.
नाशिक.-२ करीता.

सहपत्र- ४.

प्रती,

१. प्रादेशिक व्यवस्थापक , प्रादेशिक कार्यालय .....
२. महाव्यवस्थापक (अर्थ/विपणन/गोंडवन) नाशिक/नागपूर.
३. वित्त विभाग, मुख्य कार्यालय.नाशिक.
४. उप प्रादेशिक व्यवस्थापक , उप प्रादेशिक कार्यालय .....

जेगणेश१७३९८...

C-32

अर्जित रजा परिगणना करण्याच्या पद्धतीत सुधारणा

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक–अरजा. २४८८/३९५/सेवा-९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ नोव्हेंबर १९९०.

शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ५(१)(अे) अनुसार सध्या दीर्घसुटी विभागाव्यतिरिक्त अन्य विभागामध्ये सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्याने कर्तव्यार्थ व्यतित केलेल्या कालावधीच्या १/११ या दराने अर्जित रजा त्यांच्या खाती जमा केली जाते. तसेच त्यामधील नियम ६०(१)(ए) अनुसार त्याने केलेल्या सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी २० दिवस याप्रमाणे अर्धवेतनी रजा त्याचे खाती जमा केली जाते. अर्जित व अर्धवेतनी रजेची याप्रमाणे परिगणना करण्याच्या सध्याच्या पद्धतीत केंद्र शासनाप्रमाणे बदल करून ती सुलभ करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, दीर्घसुटी विभागाव्यतिरिक्त अन्य विभागामध्ये सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या अर्जित व अर्धवेतनी रजा खाती यापुढे खाली निर्देशिल्याप्रमाणे रजा जमा करण्यात यावी :—

(अ) अर्जित रजा

शासकीय कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १५ दिवस अशी २ हप्त्यांमध्ये अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात यावी. असे करताना शासकीय कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा खाती अर्ध्या वर्षाच्या अखेरीस जमा असलेली अर्जित रजा, पुढील अर्ध्या वर्षामध्ये जमा करण्यात यावी. अशा रीतीने जमा केलेली अर्जित रजा व पुढील अर्ध्या वर्षाकरिता आगाऊ जमा करण्यात यावयाची अर्जित रजा दोन्ही मिळून २४० दिवस या कमाल मर्यादेबाहेर जाऊ नये.

ज्या शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक अर्ध्या कॅलेंडर वर्षाच्या मध्येच झाली असेल त्याचे बाबतीत त्याची नेमणूक ज्या अर्ध्या कॅलेंडर वर्षात झाली असेल त्या अर्ध्या वर्षामध्ये तो पुढे जेवढी सेवा करण्याची शक्यता आहे अशा प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याच्या सेवेसाठी अडीच दिवस या दराने त्याचे खाती अर्जित रजा जमा करावी. उदाहरणार्थ, एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक १२ मार्च रोजी झालेली असेल, तर त्या अर्ध्या वर्षात त्याची सेवा पूर्ण ३ महिने इतकी होईल आणि म्हणून त्याला मिळणारी अर्जित रजा ३×५/२=७½ म्हणजेच पूर्णांकात ८ दिवस इतकी होईल. जर त्याची नेमणूक २० एप्रिल रोजी झालेली असेल तर त्या अर्ध्या वर्षातील त्याच्या सेवेच्या पूर्ण महिन्यांची संख्या २ असेल आणि त्याच्या अर्जित रजा खाती २×५/२=५ दिवस इतकी अर्जित रजा जमा होईल.

सध्या सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिनांक ३१ डिसेंबर १९९० रोजी त्यांच्या खाती शिल्लक असलेली अर्जित रजा ही १ जानेवारी १९९१ पासून सुरू होणाऱ्या अर्धवर्षासाठी उघडण्यात यावयाच्या त्यांच्या अर्जित रजेच्या नवीन खात्यामध्ये, या अर्धवर्षासाठी जमा करावयाच्या आगाऊ अर्जित रजेबरोबर जमा करण्यात यावी. असे करताना अर्जित रजेचे दिवस अपूर्णांकात येत असल्यास ते दिवस नजीकच्या दिवसाशी पूर्णांकित करण्यात यावेत.

अशा तऱ्हेने आगाऊ जमा करण्यात येणारी अर्जित रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७३ अन्वये अर्जित रजा परिवर्तन (Surrender of Earned Leave) करण्यासाठी जमेस धरता येईल.

एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने कॅलेंडर अर्धवर्षाच्या शेवटी सुरू होणारी परंतु पुढील कॅलेंडर अर्धवर्षामध्ये संपेल अशी अर्जित रजा घेतली तर तिचा हिशेब कसा करण्यात यावा हे दर्शविणारी उदाहरणे यासोबतच्या जोडपत्रामध्ये दर्शविण्यात आली आहेत.

(ब) अर्धवेतनी रजा

शासकीय कर्मचाऱ्यांच्या अर्धवेतनी रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १० दिवस अशी २ हप्त्यांमध्ये अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात यावी. असे करताना दिनांक ३१ डिसेंबर १९९० पर्यंत सेवेचे वर्ष पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत पूर्वीच्या नियमानुसार देय झालेल्या २० दिवसांच्या अर्धवेतनी रजेबरोबर दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी आगाऊ जमा करावयाची अर्धवेतनी रजा देय होईल.

ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे वर्ष दिनांक १ जानेवारी १९९० ते दिनांक ३१ डिसेंबर १९९० या कालावधीत पूर्ण होत असेल, त्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिनांक ३१ डिसेंबर १९९० पर्यंत त्या कर्मचाऱ्याने, पूर्ण वर्षांच्या खंडित कालावधीसाठी केलेल्या सेवेच्या (broken period of completed year of service) प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला ५/३ या दराने अर्धवेतनी रजा त्याच्या अर्धवेतनीरजा खाती जमा करण्यात यावी. असे करताना कर्मचाऱ्याच्या सेवेचे पूर्ण वर्ष महिन्याच्या १५ किंवा त्या अगोदरच्या तारखेस होत असल्यास त्याच्या

(शा.म.मु.) रुच २१४८ (१८,०००—१२-९०)

अर्धवेतनी रजेची परिगणना करण्यासाठी सो महिना पूर्ण धरण्यात यावा. उदाहरणार्थ एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवेचे पूर्ण वर्ष १९ मे १९९० रोजी होत असेल तर त्याच्या अर्धवेतनी रजेची परिगणना मे १९९० ते डिसेंबर १९९० या कालावधीसाठी करण्यात यावी. म्हणजेच त्याची अर्धवेतनी रजा ५/३ × ८ = ४०/३ = १३⅓ म्हणजेच १३ दिवस इतकी होईल.

सध्या सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या खाती १ जानेवारी १९९१ रोजी खालीलप्रमाणे अर्धवेतनी रजा जमा करावी :—

(१) १ जानेवारी १९९० ते ३१ डिसेंबर १९९० या कालावधीत त्याने पूर्ण केलेल्या वर्षाच्या शेवटी त्याच्या खाती शिल्लक असलेली अर्धवेतनी रजा.

अधिक

(२) वरील परिच्छेद १(ब) प्रमाणे त्याच्या खाती जमा करण्यात यावयाची खंडित [illegible] अर्धवेतनी रजा.

अधिक

(३) १ जानेवारी १९९१ पासून सुरू होणाऱ्या अर्धवर्षासाठी उघडण्यात यावयाच्या त्याच्या अर्धवेतनी रजेच्या नवीन खात्यामध्ये त्या अर्धवर्षासाठी जमा करावयाची आगाऊ अर्धवेतनी रजा.

असे करताना अर्धवेतनी रजेचे दिवस अपूर्णांकात येत असल्यास ते दिवस नजिकच्या दिवसाशी पूर्णांकित करण्यात यावेत.

२. एखादा शासकीय कर्मचारी कॅलेंडर अर्धवर्षाच्या शेवटच्या दिवशी रजेवर असेल तर तो कर्मचारी रजा संपल्यानंतर कामावर परत रुजू होण्याची दाजवी शक्यता आहे अशी, रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तरच पुढील कॅलेंडर अर्धवर्षामध्ये अर्जित व अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात यावी.

३. वरील आदेश दिनांक १ जानेवारी १९९१ पासून अंमलात येतील. या आदेशाप्रमाणे रजेचा हिशेब सुधार करण्यासाठी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे दिनांक ३१ डिसेंबर १९९० पर्यंतचे हिशेब प्रचलित पद्धतीनुसार जानेवारी १९९१ मध्ये पूर्ण करण्यात यावेत.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील तरतुदीमध्ये सुधारणा करण्याविषयीची अधिसूचना (मराठी व इंग्रजी) सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ना. कुळकर्णी,
शासनाचे उप सचिव.

C-329

जोडपत्र

उदाहरण क्र. १.—शासकीय कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खाती २३६ दिवस अर्जित रजा शिल्लक आहे व त्याने दिनांक २४ डिसेंबरपासून पंचवीस दिवसांची अर्जित रजा घेतली. त्याच्या अर्जित रजा खाती पुढीलप्रमाणे जमा/वजावट होईल :—

(अ) दिनांक २३ डिसेंबर रोजी शासकीय कर्मचाऱ्याच्या खाती शिल्लक अर्जित रजा ..	२३६ दिवस	
(ब) वजा दिनांक २४ ते दिनांक ३१ डिसेंबरपर्यंत घेतलेली आठ दिवस अर्जित रजा ..	(—) ८ दिवस	
३१ डिसेंबर रोजी शिल्लक अर्जित रजा ..	२२८ दिवस	
(क) अधिक १ जानेवारी रोजी आगाऊ जमा करावयाची पंधरा दिवस अर्जित रजा ..	(+) १५ दिवस	
एकूण ..	२४३ दिवस	परंतु नियम ५०(१)(बी) मधील तरतुदीनुसार २४० दिवसांशी मर्यादित.
(ड) वजा दिनांक १ जानेवारी ते १७ जानेवारीपर्यंत घेतलेली सतरा दिवस अर्जित रजा. ..	(—) १७ दिवस	
शिल्लक ..	२२३ दिवस	

उदाहरण क्र. २.—शासकीय कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खाती २४० दिवस अर्जित रजा शिल्लक आहे व त्याने ३० जूनपासून एकोणतीस दिवसांची अर्जित रजा घेतली. त्याच्या अर्जित रजा खाती खालीलप्रमाणे जमा/वजावट होईल :—

(अ) दिनांक २९ जून रोजी शासकीय कर्मचाऱ्याच्या खाती शिल्लक अर्जित रजा ..	२४० दिवस	
(ब) वजा ३० जून रोजी घेतलेली रजा	(—) १ दिवस	
शिल्लक ..	२३९ दिवस	
(क) अधिक १ जुलै रोजी आगाऊ जमा करावयाची पंधरा दिवस अर्जित रजा ..	(+) १५ दिवस	
एकूण ..	२५४ दिवस	परंतु नियम ५०(१)(बी) मधील तरतुदीनुसार २४० दिवसांशी मर्यादित.
(ड) वजा १ जुलै ते २८ जुलैपर्यंत घेतलेली अठ्ठावीस दिवस अर्जित रजा ..	(—) २८ दिवस	
शिल्लक ..	२१२ दिवस	

C-33

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९०

रताचे संविधान

क्र. अरजा २४८८/३९५/सेवा-९.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या तुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे ढील नियम करीत आहेत.—

१. (१) या नियमांस महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (दुसरी सुधारणा) नियम, १९९० असे म्हणता येईल.

(२) ते दिनांक १ जानेवारी १९९१ पासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ५० मध्ये (यापुढे याचा "प्रधान नियम" म्हणून उल्लेख असेल.)

(अे) खंड (१) मध्ये उप-खंड (अे) व उप-खंड (बी) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल.

"(१)(ए) दीर्घ सुटी विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांमध्ये सेवेत असलेल्या प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १५ दिवस याप्रमाणे दोन हप्त्यांमध्ये अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात येईल.

(बी) शासकीय कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा खाती मागील अर्ध्या वर्षाच्या अखेरीस जमा असलेली अर्जित रजा पुढील अर्ध्या वर्षामध्ये जमा करण्यात येईल. मात्र, अशा रीतीने जमा केलेली मागील अर्जित रजा व पुढील अर्ध्या वर्षाकरिता आगाऊ जमा करण्यात येणारी अर्जित रजा २४० दिवसांच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

(बी) खंड (३) मध्ये "१८०" या संख्येऐवजी "२४०" ही संख्या दाखल करण्यात यावी.

३. प्रधान नियमातील नियम ५१ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"५१. अर्जित रजेची गणना.—(१) ज्या कॅलेंडर वर्षामध्ये शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती झाली असेल त्या कॅलेंडर वर्षाच्या अर्ध्या वर्षामध्ये तो जेवढे महिने सेवा करण्याची शक्यता असेल त्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला २½ दिवस हा दराने त्याच्या अर्जित रजा खाती रजा जमा करण्यात येईल.

(२)(अे) ज्या अर्धवर्षाच्या कालावधीमध्ये शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होणार असेल किंवा शासकीय सेवेचा त्याने राजीनामा दिला असेल त्या अर्ध्या वर्षामध्ये त्याच्या सेवानिवृत्तीच्या/राजीनाम्याच्या दिनांकापर्यंत सेवेच्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला २½ दिवस या दराने त्याच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात येईल.

(चार) ज्या शासकीय कर्मचाऱ्यास नोकरीमधून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा सेवेत असताना त्याचा मृत्यू झाला असेल त्याच्या बाबतीत ज्या कॅलेंडर महिन्यात त्याला नोकरीमधून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या आधीच्या कॅलेंडर महिन्याच्या शेवटापर्यंत, प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला २½ दिवस या दराने त्याच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात येईल.

(३) जर एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने अर्ध्या वर्षामध्ये असाधारण रजा घेतली असेल आणि/किंवा अनुपस्थितीचा काही कालावधी "अकार्यदिन" (Dies-non) म्हणून समजण्यात आला असेल तर पुढील अर्ध्या वर्षाच्या सुरुवातीस त्याच्या रजा खाती जमा करावयाची रजा, अशा रजेच्या आणि/किंवा "अकार्यदिन" च्या (Dies-non) कालावधीच्या १/१० इतकी कमी करण्यात येईल, मात्र अशी कमी करावयाची रजा १५ दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(४) अर्जित रजा जमा करताना रजेचे दिवस अपूर्णांकात आल्यास ते नजिकच्या दिवसाशी पूर्णांकित करण्यात येतील."

४. प्रधान नियमातील नियम ६०. मध्ये,—

(ए) खंड (१) मध्ये उप-खंड (ए) च्या ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(ए) (एक) प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याच्या अर्धवेतनी रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १० दिवस याप्रमाणे दोन हप्त्यांमध्ये अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात येईल.

(दोन) ज्या कॅलेंडर वर्षाच्या अर्ध्या वर्षामध्ये शासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक झाली असेल त्या अर्ध वर्षामध्ये शासकीय कर्मचारी जेवढे महिने सेवा करण्याची अपेक्षेयता असेल, अशा प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला ५/३ या दराने अर्धवेतनी रजा त्याच्या अर्धवेतनी रजा खाती जमा करण्यात येईल.

(तीन) ज्या अर्ध वर्षाच्या कालावधीमध्ये शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होणार असेल किंवा त्याने शासकीय सेवेचा राजीनामा दिला असेल त्या अर्ध वर्षामध्ये त्याच्या सेवा-निवृत्तीच्या किंवा राजीनाम्याच्या दिनांकापर्यंत, सेवेच्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला ५/३ या दराने त्याच्या खाती अर्धवेतनी रजा जमा करण्यात येईल.

(चार) ज्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवेतून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा सेवेत असताना त्याचा मृत्यू झाला असेल त्याच्या बाबतीत, ज्या कॅलेंडर महिन्यात त्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या आधीच्या कॅलेंडर महिन्याच्या शेवटापर्यंत प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला ५/३ या दराने अर्धवेतनी रजा त्याचे खाती जमा करण्यात येईल.

(पाच) शासकीय कर्मचाऱ्याच्या अनुपस्थितीचा किंवा निलंबनाचा कालावधी अर्ध वर्षामध्ये "अकार्यदिन" (Dies-non) असा समजण्यात आला असेल त्याबाबतीत पुढील अर्ध्या वर्षाच्या सुरुवातीस त्याच्या अर्धवेतनी रजेच्या खाती जमा करावयाची अर्धवेतनी रजा अशा "अकार्यदिन" च्या (Dies-non) कालावधीच्या १/१८ इतकी कमी करण्यात येईल, मात्र अशी कमी करावयाची रजा दहा दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(सहा) अर्धवेतनी रजा जमा करताना रजेचे दिवस अपूर्णांकीत आल्यास ते नजीकच्या दिवसाशी पूर्णांकित करण्यात येतील."

(बी) उप-खंड (२) वगळण्यात यावा.

प्रधान नियमातील परिशिष्ट पाच मधील नमुना २ ऐवजी पुढील नमुना दाखल करण्यात यावा :—

वाचा:- १) मुख्य कार्यालय आदेश क्र.आविम/प्रशा/अस्था-२/३२३३/९८, दि.१७.०३.१९९८
२) शासन निर्णय वित्त विभाग, मंत्रालय क्र.अरजा-२४०१/८/सेवा-९, दि.१५.०१.२००१
३) संचालक मंडळाची सभा दिनांक १९.०९.२००८ रोजीचा ठराव क्रमांक-६

जा.क्र.आविम/प्रशा/अस्था-२/ १६२० /०९
ना सि क - ४२२ ००२
दिनांक :-22 जानेवारी,२००९

आ दे श.

शासनाच्या वित्त विभागाचे संदर्भ-२ येथील शासन निर्णयानुसार अर्जित रजा साठविण्याची तसेच सेवानिवृत्तीच्यावेळी अर्जित रजेचे रोखीकरण करणेची २४० दिवसांची मर्यादा ३०० दिवसांपर्यंत वाढविण्या आलेली आहे.

दिनांक १९.०९.२००८ चा ठराव क्रमांक-६ अन्वये सदर शासन निर्णयानुसार महामंडळामध्ये सद्या अस्तित्वात असलेली अर्जित रजा साठविण्याची तसेच न उपभोगलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची २४० दिवसांची कमाल मर्यादा ३०० दिवस इतकी वाढविण्याची उपविधीत दुरुस्ती होईपर्यंत उपभोगण्याची अनुमती शासनाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अटीवर देणेत येत आहे.

Regional Manager
M. S. C. T. D. C., Nasik
Inward No. 9626
Date 23-9-09

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०१ जानेवारी,२००९ पासुन करण्यात यावी.

स्थळ प्रतीवर मा.व्य.सं.)
यांची स्वाक्षरी असे...)

व्यवस्थापकीय संचालक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
ना सि क करीता.

प्रति,

१. प्रादेशिक व्यवस्थापक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
प्रादेशिक कार्यालय, - - - - - - - - - -

२. उप प्रादेशिक व्यवस्थापक
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
उप प्रादेशिक कार्यालय, - - - - - - - - - -

३. महाव्यवस्थापक (प्रशासन/विपणन/वित्त/गोंडवन)
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
मुख्य कार्यालय,नासिक/विभागीय कार्यालय,नागपूर.

मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचा-यांना मंजूर करावयाच्या अग्रिमाबाबत..

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक -अग्रिम-२०१०/प्र.क्र.१६/१०/विनियम

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक १० जून, २०१०

पहा:-(१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-अग्रिम-१०९०/(२३)/विनियम, दिनांक ७ जून, १९९०.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- अग्रिम-१०८९/(१०)/विनियम, दिनांक २६ जुलै, १९९१.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- अग्रिम-१०९९/प्र.क्र.३/९९/विनियम, दिनांक ९ जुलै, १९९९.

(४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- अग्रिम-१०.०५/प्र.क्र.१८/२००५/विनियम, दिनांक २० जून २००५

प्रस्तावना:- शासन अधिसूचना वित्त विभाग, क्रमांक:वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि. २२ एप्रिल, २००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित करण्यात आल्या आहेत. या सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन (Pay in the Pay-Band) विचारात घेऊन, राज्य शासकीय कर्मचा-यांना नवीन मोटार सायकल/स्कूटर/मोपेड/सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी तीन चाकी स्वयंचलीत सायकल किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीकरिता अग्रिम मंजूर करताना, संदर्भाधिन शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ९ जुलै, १९९९ व दि.२० जून २००५ अन्वये विहित केलेल्या वेतनमर्यादा सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. यासंदर्भात शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

शासन निर्णय

नवीन मोटार सायकल/स्कूटर/मोपेड/सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी तीन चाकी स्वयंचलीत सायकल किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचा-यांना मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम १३६, १३७ व १३९ च्या अधीन राहून खाली नमूद केलेल्या वेतन मर्यादेनुसार अग्रिम मंजूर करण्यात यावा:-

(अ) नवीन मोटार सायकल, अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम:-

(१) ज्या कर्मचा-यांचे वेतन-बँड मधील मासिक वेतन रु.८,५६०/- किंवा अधिक आहे अशा कर्मचा-यांना या प्रयोजनासाठी अग्रिम अनुज्ञेय राहील.

(२) वेतन-बँड मधील मासिक वेतनाच्या ६ पट एवढी रक्कम किंवा रु.४५,०००/- किंवा मोटार-सायकलची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील.

(३) अग्रिमाची वसूली व्याजासह ६० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम अग्रिम व नंतर व्याज वसूल करण्यात यावे.

(ब) नवीन स्कूटर खरेदी करण्यासाठी अग्रिम:-

(१) ज्या कर्मचा-यांचे वेतन-बँड मधील मासिक वेतन रु.८,५६०/- किंवा अधिक आहे अशा कर्मचा-यांना या प्रयोजनासाठी अग्रिम अनुज्ञेय राहील.

(२) वेतन-बँड मधील मासिक वेतनाच्या ४ पट एवढी रक्कम किंवा रु. २८,०००/- किंवा स्कूटरची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील.

(३) अग्रिमाची वसूली व्याजासह ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम अग्रिम व नंतर व्याज वसूल करण्यात यावे.

(क) नवीन मोपेड खरेदी करण्यासाठी अग्रिम:-

(१) ज्या कर्मचा-यांचे वेतन-बँड मधील मासिक वेतन रु.८,५६०/- किंवा अधिक आहे अशा कर्मचा-यांना या प्रयोजनासाठी अग्रिम अनुज्ञेय राहील.

(२) वेतन-बँड मधील मासिक वेतनाच्या २ पट एवढी रक्कम किंवा रु.१४,०००/- किंवा मोपेडची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील.

(३) अग्रिमाची वसूली व्याजासह ३० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम अग्रिम व नंतर व्याज वसूल करण्यात यावे.

(ड) नवीन सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम:-

(१) ज्या कर्मचा-यांचे ग्रेड वेतन रु.२,८००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा अराजपत्रित कर्मचा-यांना या प्रयोजनासाठी अग्रिम अनुज्ञेय राहील.

(२) रु.२,५००/- किंवा सायकलची प्रत्यक्ष किंमत (विक्रीकर धरुन) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील.

(३) अग्रिमाची वसूली व्याजासह १० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम अग्रिम व नंतर व्याज वसूल करण्यात यावे.

३. उपरोक्त अग्रिम खालील अटींच्या अधिन अनुज्ञेय राहील:-

(१) मोटार सायकल/स्कूटर/मोपेड वाहन चालविण्यासाठी सक्षम अधिका-यांकडून मिळालेल्या अनुज्ञप्ती (LICENCE) ची छायाप्रत (झेरॉक्स) प्रत सादर करावी.

(२) वाहनांच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करण्यात यावेत.

(३) नवीन मोटार सायकल, अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत तीन चाकी सायकल, स्कूटर, मोपेडचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची दक्षता घेण्यात यावी.

(४) मोटार सायकल, अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत तीन चाकी सायकल, सायकल, स्कूटर, मोपेड शासनाकडे तारण टाकली पाहिजे.

(५) सदर शासन निर्णयानुसार एकदा अग्रिम दिल्यानंतर पुन्हा अग्रिम अनुज्ञेय राहणार नाही. तसेच सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी, शासकीय अग्रिम घेऊन खरेदी केलेल्या जुन्या वाहनाऐवजी पुन:श्च नवीन वाहन खरेदीसाठी अग्रिम अनुज्ञेय राहणार नाही. तथापि, अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तीन चाकी सायकल खरेदी करिता ही अट शिथील करण्यात येत आहे.

करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची कर्मचाऱ्यास प्रतिपुर्ती करण्यात येईल. अशा प्रकरणी रेल्वे प्रशासनाने कोणताही परतावा नाकारला असेल तर तिकिट आरक्षित करण्यासाठी खर्च कराव्या लागलेल्या संपूर्ण रकमेची त्याला प्रतिपूर्ती करण्यात येईल. मात्र वरील दोन्ही प्रकरणी, लोकहितास्तव वा शासकीय कर्मचाऱ्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांसाठी तिकिट रद्द करावे लागत असल्याचे त्याच्या नियंत्रक अधिकाऱ्याने प्रमाणित केले पाहिजे.

५. <u>किलोमीटर भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४ (१) आणि (२):-</u>

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील नालकीच्या अथवा भाड्याच्या वाहनातून * केलेल्या प्रवासासाठी अनुज्ञेय असलेल्या किलोमीटर भत्त्याचे दर खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत:-

श्रेणी	शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	मोटार कार/जीप		मोटार सायकल/ स्कूटर/ ऑटोरिक्षा	मोपेड/ लूना	अन्य वाहने
		पेट्रोल	डिझेल			
१	२	३	४	५	६	७
	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.
प्रथम श्रेणी	रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) **	९.००	७.००	३.५०	१.७५	--
द्वितीय श्रेणी	अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी **	९.००	७.००	३.५०	१.७५	१.००
	ब) रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी	--	--	३.५०	१.७५	१.००
तृतीय श्रेणी	रुपये ४,२००/- पेक्षा कमी	--	--	--	१.७५	१.००

* टीप-१) ज्या ग्रेड वेतनाच्या समोर किलोमीटर भत्त्याचे दर दर्शविण्यात आले आहेत त्या ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी त्या प्रकारचे वाहन बाळगण्यास पात्र समजण्यात येतील.

** टीप-२) ग्रेड वेतनगटातील अधिकारी टॅक्सीने प्रवास केल्यास स्तंभ ३ मधील दराने किलोमीटर भत्ता मिळण्यास पात्र असतील.

५-अ) <u>आनुषंगिक प्रवासाचा खर्च-</u>

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील याविषयीची पुढील तरतूद तशीच चालू राहील:-

दौऱ्यानिमित्त करावयाच्या मुख्य प्रवासाच्या अनुषंगाने करावयाचा आनुषंगिक (म्हणजे कामाच्या ठिकाणापासून रेल्वे/विमान/बस स्थानकापर्यंतच्या व परत असा) प्रवास शासकीय कर्मचाऱ्यास दौऱ्यासाठी अनुज्ञेय असलेल्या रेल्वे/सार्वजनिक बस सेवेच्या अनुज्ञेय वर्गाने करण्याची आणि वरील वाहनांव्यतिरिक्त इतर साधनांनी प्रवास केल्यास त्यासाठीचा प्रत्यक्ष खर्च हा त्या वाहनासाठी विहित केलेल्या किलोमिटर भत्त्याच्या दराशी सिमित करुन देण्याची तरतूद यापुढेही अनुज्ञेय राहील. **आनुषंगिक प्रवास खर्चाचा समावेश मूळ प्रवास भत्ता देयकातच करणे आवश्यक आहे.**

४.३ सार्वजनिक वाहनातून रस्ता मार्गाने प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४ आणि ४९०)

अ.क्र.	शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास भत्त्याची पात्रता
१	रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)	वातानुकुलित बससहित इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे
२	रुपये ४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/-पेक्षा कमी	वातानुकुलित बसखेरीज इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे
३	रुपये ४,४००/- पेक्षा कमी	सर्वसाधारण सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे

४.४. बोटीने प्रवास (समुद्र आणि नदी) (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४०६ आणि ४९०):-

समुद्र अथवा नदीवरील बोटीच्या प्रवासासाठी पात्रता खालीलप्रमाणे असेल:-

श्रेणी	शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	समुद्र किंवा नदीवरील बोटीच्या वर्गाची पात्रता
प्रथम श्रेणी	रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)	उच्चतम वर्ग
द्वितीय श्रेणी	अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी ब) रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी	दोन वर्गातील वरचा, तीनमधील मधला वर्ग, चार मधील दुसरा, दोन वर्गामधील खालचा, तीनमधील मधला वर्ग, चारमधील तिसरा.
तृतीय श्रेणी	रुपये ४,२००/- पेक्षा कमी	निम्नतम वर्ग.

४.५ रेल्वेने जोडलेल्या अथवा न जोडलेल्या दोन विवक्षित ठिकाणांदरम्यान वाहतूक अधिकाऱ्यांनी दर प्रमाणित केलेल्या टॅक्सीमधील एक आसन भाड्याने घेतल्यास अशा प्रकरणी, जर ती दोन ठिकाणे रेल्वेने जोडलेली असतील तर आलेला प्रत्यक्ष खर्च संबंधितास त्या मार्गावर उपलब्ध असलेल्या रेल्वेच्या अनुज्ञेय वर्गाच्या भाड्याशी सिमित करुन आणि जर ती दोन ठिकाणे रेल्वेने जोडलेली नसतील तर सार्वजनिक परिवहन सेवेच्या त्या मार्गावर उपलब्ध असलेल्या अनुज्ञेय वाहनाच्या भाड्याशी सीमित करुन देण्याची वरील (१) येथील दि.४डिसेंबर, १९९९ च्या आदेशातील तरतूद यापुढेही चालू राहील.

४.६ प्रवासाची तिकीटे रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची प्रतिपूर्ती:-

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.टीआरए-१००४/प्र.क्र.२७/सेवा-५, दिनांक १० जून, २००४ मधील प्रवासाची तिकीटे रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या प्रतिपूर्तीसंबंधीची पुढील तरतूद तशीच चालू राहील:-

शासकीय कामकाजानिमित्त विमानाने /रेल्वेने/सार्वजनिक बससेवेच्या बसने प्रवास करण्यासाठी आरक्षित केलेले तिकिट रद्द करण्यात आल्यास, आरक्षण रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची (Cancellation Charge) शासकीय कर्मचाऱ्यास प्रतिपूर्ती करण्यात येईल. तात्काळ आरक्षण सेवेचा लाभ घेऊन खरेदी केलेले रेल्वे प्रवासाचे तिकिट रद्द

** टीप:- २) ग्रेड वेतन मर्यादेतील राजपत्रित अधिकारी प्रथम वर्गाने, वातानुकुलित३-स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

टीप:- ३) रेल्वेच्या प्रथम वर्गाने अथवा कोणत्याही वातानुकुल वर्गाने केलेल्या प्रवासाच्या प्रकरणी प्रवासभत्ता देयकात तिकीट क्रमांक, दिनांक इत्यादी तपशील नमूद करणे आवश्यक असेल.

"तक्ता -ब"

श्रेणी	शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास पात्रता	
		राजधानी एक्सप्रेस	शताब्दी एक्सप्रेस
प्रथम श्रेणी	अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी	वातानुकुलित प्रथम वर्ग/द्वितीय वर्ग वातानुकुलित २ - स्तर शयनयान. द्वितीय वर्ग वातानुकुलित २ -स्तर शयनयान	एक्झिक्युटिव्ह क्लास वातानुकुलित खुर्ची यान.
द्वितीय श्रेणी	रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी *	वातानुकुलित खुर्ची यान.	-----

* टीप-१:- या ग्रेड वेतन मर्यादेतील शासकीय कर्मचारी वातानुकुलित खुर्ची यान पुरविलेले नसल्यास वातानुकुलित ३ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

टीप-२:- जेव्हा भोजनाची व नाश्त्याची विनामुल्य सोय असलेल्या कोणत्याही गाडीने प्रवास केला जाईल तेव्हा प्रवास कालावधीचा ५०% दैनिक भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्ता देयकातून कमी केला जाईल.

तात्काळ आरक्षण शुल्क:- वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील तात्काळ आरक्षण शुल्कासंबंधीची तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

शासकीय कर्मचाऱ्यांना तातडीच्या परिस्थितीत मंत्री / प्रशासनिक विभागाच्या सचिवांनी मंत्रालयात आयोजित केलेल्या बैठकांनिमित्त राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून मुंबई येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासाराठी, विधीमंडळ कामकाजास्तव राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून मुंबई / नागपूर येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी आणि न्यायालयीन कामकाजास्तव राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून दिल्ली / मुंबई / नागपूर / औरंगाबाद येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी रेल्वेचे सर्वसाधारण आरक्षण सेवेद्वारे तिकीट उपलब्ध न झाल्यास, तात्काळ आरक्षण सुविधेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र, नियंत्रक अधिकाऱ्यांनी प्रवासाची निकड प्रमाणित करणे आवश्यक असेल.

एजन्सी शुल्क:- वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील याविषयीची तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

प्रवास भत्त्यावरील, मुख्यत्वे विमान प्रवासावरील खर्च कमी व्हावा म्हणून, स्वेच्छा निर्णयानुसार विमान प्रवास अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना रेल्वे आरक्षणासाठी रेल्वेने परवाना दिलेल्या अधिकृत एजन्सीने आकारलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

क्र.आयपीएस-२६०५/प्र.क्र.६३०/पोल-१, दि.६ नोव्हेंबर, २००६ हे विशेष आदेश यापुढेही अंमलात राहतील.

तसेच, विमानप्रवासासंदर्भातील अमेरिकन एक्सप्रेस इंडियन एअरलाइन्स गोल्ड / सिल्व्हर (ग्रीन) कार्डची सुविधा रद्द करण्यात येत आहे.

क) न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने / मार्गाने वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधित प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमानप्रवास करता येईल. मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणाऱ्या विमान कंपनांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे. अशा कंपनीच्या विमानाचे तिकीट उपलब्ध न झाल्यास सर्वसाधारण विमान कंपन्यांच्या इकॉनॉमी क्लासने विमान प्रवास करता येईल. परतीच्या प्रवासासाठी ही सवलत यापुढे अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीनेच वरीलप्रमाणे विमानप्रवास करता येईल. प्रशासनिक विभागाच्या सचिवांनी उपरोक्त कारणांसाठी अवर सचिव आणि त्यापेक्षा उच्च दर्जाच्या मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनाच विमान प्रवासास परवानगी द्यावी. इतर कोणत्याही कारणांसाठी विमानप्रवास अनुज्ञेय असणार नाही.

ड) तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांना, ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचेसोबत प्रवास करीत असतील तरच आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या पूर्व परवानगीनेच इकॉनॉमी क्लासने विमानप्रवास अनुज्ञेय राहील. मंत्री व राज्यमंत्री यांचे आस्थापनेवरील खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक यांना तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या आस्थापनेवरील स्वीय सहाय्यकांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

४.२ <u>रेल्वे प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४०० आणि ४९०):-</u>

सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने दौऱ्यावरील व बदलीनंतरच्या रेल्वे प्रवासासंबंधीची पात्रता पुढीलप्रमाणे असेल:-

"तक्ता - अ"

श्रेणी	शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास पात्रता - ऑर्डिनरी मेल, एक्सप्रेस पॅसेंजर ट्रेन आणि अन्य सुपर फास्ट ट्रेन्स
प्रथम श्रेणी	अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी	वातानुकुलित प्रथम वर्ग / वातानुकूलित २-स्तर शयनयान. द्वितीय वर्ग वातानुकुलित २ -स्तर शयनयान/ प्रथम वर्ग/वातानुकूलित खुर्ची यान
द्वितीय श्रेणी	अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी *	प्रथम वर्ग/वातानुकुलित ३ -स्तर शयनयान/ वातानुकुलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान.
तृतीय श्रेणी	अ)रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी ** ब) रु.४,२००/- पेक्षा कमी	वातानुकुलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान. द्वितीय वर्ग शयनयान

* टीप:- १) ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी, प्रवासाचे सुरुवातीचे व शेवटचे ठिकाण अखंडीतपणे व सर्वात जवळच्या मार्गाने जोडणा-या कोणत्याही रेल्वेमध्ये त्यांना अनुज्ञेय ठरविण्यात आलेले वर्ग उपलब्ध नसल्यास, वातानुकूलित २-स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक - प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ०३ मार्च, २०१०.

पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५, दिनांक ४ डिसेंबर, १९९९
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९९
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.८०सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, २००६
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक १९जून, २००६
(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक ११ डिसेंबर, २००६
(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक १०जानेवारी, २००७
(७) भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक:एफ क्र.१९०३०/३/२००८-ई-चार, दिनांक २३सप्टेंबर, २००८.

शासन निर्णय

सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्याच्या दरामध्ये वरील (७) येथील दिनांक २३सप्टेंबर, २००८ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे. राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्त्याच्या दरात त्याप्रमाणे सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधिन होता.

शासन आता असे आदेश देत आहे की, दौरा आणि बदलीशी संबंधित प्रवास भत्त्यांच्या नियमांतील विशिष्ट तरतूदी व दर खालील परिच्छेदांत दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात येत आहेत. प्रवास भत्ता नियमांच्या / आदेशांच्या अन्य तरतूदी पूर्वीप्रमाणेच अंमलात राहतील. शासन असेही आदेश देत आहे की, प्रवासभत्ता विषयक सर्व तरतूदी काटकसरीच्या उपाययोजनांसंबंधीच्या सध्याच्या तसेच भविष्यात काढल्या जाणाऱ्या आदेशांच्या अधीन अंमलात राहतील.

२. (अ) या आदेशांच्या प्रयोजनार्थ "वेतन" म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतन (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतन) होय.

(ब) जे कर्मचारी असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेतील त्यांच्या बाबतीत विविध भत्त्यांची रक्कम परिगणित करताना त्यांनी धारण केलेल्या पदाचे सुधारित वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे.

असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याबाबतीत संयुक्त बदली अनुदानाची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांचे वेतन म्हणजे असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतन आणि दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी लागू असणाऱ्या दराने अनुज्ञेय महागाई भत्ता होय.

(क) या आदेशांतील प्रवासभत्ताविषयक तरतुदींच्या प्रयोजनार्थ कर्मचारी प्रत्यक्ष धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे. कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ देण्याच्या दृष्टीने अंमलात असलेल्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मंजूर केलेल्या उच्च वेतन संरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येऊ नये. मात्र, ज्या पदांच्या बाबतीत विशिष्ठ कालावधीच्या सेवेनंतर अकार्यात्मक (Non-functional) उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येते अशा पदधारकांच्या बाबतीत, त्या उच्च वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात यावे.

३. शासकीय कर्मचाऱ्यांची वर्गवारी (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३७७):-

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद ३ मधील तरतूद सुधारून, सुधारित वेतनसंरचनेच्या अनुषंगाने दौऱ्यादरील व बदलीच्या प्रवासभत्त्याच्या नियमनासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

श्रेणी	सुधारित वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन
प्रथम श्रेणी	रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)
द्वितीय श्रेणी	रुपये ४,४००/- व त्याहून अधिक मात्र रू.६,६००/-पेक्षा कमी
तृतीय श्रेणी	रुपये ४,४००/- पेक्षा कमी

४. निरनिराळ्या प्रवास साधनांतील जागेच्या वर्गासाठीची पात्रता:

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद ४ मधील तरतूद सुधारून, सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांची स्वेच्छानिर्णयानुसार दौऱ्यावरील व बदली निमित्ताच्या विमान प्रवासासाठी आणि रेल्वे, सार्वजनिक बसेस व बोट यांच्यामधील वेगवेगळ्या जागेच्या वर्गासाठीची पात्रता खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

४.१. विमान प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१७-ब आणि ४९०)

विमान प्रवासासंबंधी तरतूदी पुढीलप्रमाणे लागू राहतील:-

अ) सचिवांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. सचिव व सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना फक्त इकॉनॉमी क्लासनेच विमान प्रवास अनुज्ञेय राहील.

प्रधान सचिव व त्याहून उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांना एअर इंडिया व इंडियन या विमान कंपन्यांच्या विमानाने एक्झिक्युटिव्ह क्लासने विमान प्रवास अनुज्ञेय राहील. मात्र इकॉनॉमी वर्गाचा प्रवास कोणत्याही विमान कंपनीच्या विमानाने अनुज्ञेय राहील.

वरील अधिकाऱ्यांनी विमानप्रवासाची तिकीटे इंटरनेटवर उपलब्ध ई-तिकीट सेवेद्वारे काढावीत. यासाठी आकारण्यात येणाऱ्या आनुषंगिक खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. इकॉनॉमी वर्गाच्या पूर्ण दराची (Full Fare Economy Tickets) तिकीटे काढू नयेत.

ब) विमानप्रवास अनुज्ञेयतेविषयी अंमलात असलेले सध्याचे शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास-१००३/प्र.क्र.३८/सेवा-५, दि.२० एप्रिल, २००४, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास-१००५/प्र.क्र.५३/सेवा-५, दि.२७ सप्टेंबर, २००५ व शासन निर्णय, गृह विभाग,

(अ) या आदेशाच्या प्रयोजनार्थ "वेतन" म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम-२००९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील मुळवेतन (वेतन बॅन्ड मधील वेतन+ग्रेड वेतन) होय.

(ब) जे कर्मचारी असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेतील त्यांच्या बाबतीत विविध भत्त्यांची रक्कम परिगणीत करतांना, त्यांनी धारण केलेल्या पदाचे सुधारित वेतन संरचनेतील ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे.

असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याबाबतीत संयुक्त बदली अनुदानाची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांचे वेतन म्हणजे असुधारित वेतनश्रेणीतील मुळवेतन अधिक महागाई वेतन आणि दिनांक ०१ जानेवारी,२००६ रोजी लागू असणाऱ्या दराने अनुज्ञेय महागाई भत्ता होय.

(क) या आदेशातील प्रवास भत्ताविषयक तरतुदींच्या प्रयोजनार्थ कर्मचारी प्रत्यक्ष धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे. कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ देण्याच्या दृष्टीने अंमलात असलेल्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मंजूर केलेल्या उच्च वेतन संरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येऊ नये, मात्र ज्या पदांच्या बाबतीत विशिष्ठ कालावधीच्या सेवेनंतर अकार्यात्मक (Non-functional) उच्च वेतन संरचना मंजुर करण्यात येते अशा पदधारकांच्या बाबतीत, त्या उच्च वेतन संरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात यावे.

१. महामंडळ कर्मचाऱ्यांची वर्गवारी :-

वरील संदर्भ-३ येथील दिनांक ०९.१२.२००५ च्या आदेशातील परिच्छेद-१ मधील तरतुद सुधारुन, सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने दौऱ्याच्या व बदलीच्यावेळी प्रवास भत्त्याच्या नियमनासाठी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची वर्गवारी खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

श्रेणी	सुधारित वेतन संरचनेतील ग्रेड वेतन
१	२
प्रथम श्रेणी	रुपये ६६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)
द्वितीय श्रेणी	रुपये ४४००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ६६००/- पेक्षा कमी.
तृतीय श्रेणी	रुपये ४४००/- पेक्षा कमी

३...

वाचा :- १) सेवानियम क्रमांक-५१ ते ६४
२) या कार्यालयाचा आदेश क्र.आविम/प्रशा/अस्था-२/१३८/९४, दि.०६.१०.१९९४
३) या कार्यालयाचा आदेश क्र.आविम/प्रशा/अस्था-२/१०३१/०५, दि.०९.१२.२००५
४) वित्त विभाग शासन निर्णय क्र.प्रवास-१०१०/प्र.क्र.०२/९८/सेवा-५, दि.०३.०३.२०१०
५) आ.वि.वि.शासन निर्णय क्र.आस्था-२०१०/प्र.क्र.२२२ (संदर्भ क्र.२३४५/०९)/का.१, दिनांक ३१.०५.२०१०
६) या कार्यालयाचे पत्र क्र.आविम/प्रशा/अस्था-४/८०४/१०, दि.०५.०६.२०१०
७) संचालक मंडळ सभा दिनांक १२.११.२०१० ठराव क्रमांक-५

जा.क्र.आविम/प्रशा/आस्था-२/ /१०
ना सि क- ४२२ ००२.
दिनांक :-२९ डिसेंबर,२०१०

आ दे श.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना महामंडळाचे सुधारित सेवानियम क्रमांक-५१ ते ६४.च्या तरतुदीनुसार दैनिक भत्ता व बदली प्रवास भत्ते इत्यादी मंजुर करण्याची तरतुद आहे. महामंडळाच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर केलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या धर्तीवर सुधारित वेतनश्रेणी लागू केली आहे.

सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्याच्या दरामध्ये वरील संदर्भ क्रमांक-४ शासन निर्णय क्रमांक:प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०३ मार्च,२०१० अन्वये प्रवास भत्त्याचे दरात राज्य शासनाने सुधारणा केली आहे.

राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर केलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या धर्तीवर महामंडळाच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांनाही मंजुर केलेल्या सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यामुळे महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली आहे. वेतनश्रेणीत सुधारणा झाल्यानंतर प्रवास भत्ता/बदली भत्ते यांच्या दरांमध्ये सुधारणा करण्याचा तसेच या अनुषंगाने विहित करण्यात आलेल्या विशिष्ट तरतुदी निश्चित करण्याचा प्रश्न महामंडळाच्या विचाराधीत होता, त्यानुसार आदेश देण्यात येत आहे की, दौऱ्यावर किंवा बदलीच्यावेळी प्रवास भत्त्याच्या नियमातील विशिष्ट तरतुदी व दर खालील परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात येत आहेत. प्रवास भत्ता नियमांच्या/आदेशांच्या अन्य तरतुदी महामंडळाचे सेवानियमाप्रमाणे पूर्वीप्रमाणेच अंमलात राहतील. प्रवास भत्ता विषयक अन्य तरतुदी काटकसरीच्या उपाय योजनां संबंधीच्या सद्याच्या तसेच भविष्यात काढल्या जाणाऱ्या आदेशांच्या अधीन अंमलात राहतील.

२...

२. निरनिराळ्या प्रवास साधनांतील जागेच्या वर्गासाठीची पात्रता :-

वरील संदर्भ-३, दिनांक ०९.१२.२००५ च्या आदेशातील परिच्छेद-२ मधील तरतुद सुधारुन, सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची स्वेच्छा निर्णयानुसार दौऱ्यावरील व बदली निमित्ताच्या विमान प्रवासासाठी आणि रेल्वे, सार्वजनिक बसेस व बोट यांच्यामधील वेगवेगळ्या जागेच्या वर्गासाठीची पात्रता खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

२.१ विमान प्रवास :- मा.व्यवस्थापकीय संचालक व विशेष बाब म्हणून रुपये ६६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) या सुधारित वेतन संरचनेतील ग्रेड वेतन घेणारे अधिकारी, मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे पूर्वपरवानगीने दौऱ्यावर व बदलीनंतर सार्वजनिक क्षेत्रातील विमान सेवेने प्रवास करण्यास पात्र असतील.

२.२ रेल्वे प्रवास :- सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने दौऱ्यावर व बदलीनंतर रेल्वे प्रवासासंबंधीची पात्रता खालील प्रमाणे...

तक्ता 'अ'

श्रेणी	महामंडळाचे कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास पात्रता ऑर्डीनरी मेल, एक्सप्रेस, पॅसेंजर ट्रेन आणि अन्य सुपन फास्ट ट्रेन.
१	२	३
प्रथम श्रेणी	अ) रुपये ८९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)	वातानुकूलित प्रथम वर्ग/वातानुकूलित २ स्तर शयनयान.
	ब) रुपये ६६००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ८९००/- पेक्षा कमी.	द्वितीय वर्ग वातानुकूलित २ स्तर शयनयान/ प्रथम वर्ग / वातानुकूलित खुर्ची यान.
द्वितीय श्रेणी	अ) रुपये ४४००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ६६००/- पेक्षा कमी *	प्रथम वर्ग/वातानुकूलित ३ स्तर शयनयान/ वातानुकूलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान.
तृतीय श्रेणी	अ) रुपये ४२००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ४४००/-पेक्षा कमी **	वातानुकूलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान.
	ब) रुपये ४२००/- पेक्षा कमी.	द्वितीय वर्ग शयनयान.

४...

टिप :- * १) ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी प्रवासाचे सुरवातीचे व शेवटचे ठिकाण अखंडीतपणे व सर्वात जवळच्या मार्गाने जोडणाऱ्या कोणत्याही रेल्वे मध्ये त्यांना अनुज्ञेय ठरविण्यात आलेले वर्ग उपलब्ध नसल्यास, वातानुकूलित दोन स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

** २) ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी प्रथम वर्गाने, वातानुकूलित तीन स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

३) रेल्वेच्या प्रथम वर्गाने अथवा कोणत्याही वातानुकूल वर्गाने केलेल्या प्रवासाच्या प्रकरणी प्रवासभत्ता देयकात तिकिट क्रमांक, दिनांक इत्यादी तपशिल नमूद करणे आवश्यक असेल.

तक्ता 'ब'

श्रेणी	महामंडळाचे कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास पात्रता	
		राजधानी एक्सप्रेस	शताब्दी एक्सप्रेस
१	२	३	४
प्रथम श्रेणी	अ) रुपये ८९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)	वातानुकूलित प्रथम वर्ग/ द्वितीय वर्ग वातानुकूलित २ स्तर शयनयान.	एक्झिक्युटिव्ह क्लास
	ब) रुपये ६६००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ८९००/- पेक्षा कमी.	द्वितीय वर्ग वातानुकूलित २ स्तर शयनयान.	वातानुकूलित खुर्चीयान.
द्वितीय श्रेणी	अ) रुपये ४४००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ६६००/- पेक्षा कमी *	वातानुकूलित खुर्चीयान.	-

टिप :- * १) या ग्रेड वेतन मर्यादेतील कर्मचारी वातानुकूलित खुर्चीयान पुरविलेले नसल्यास, वातानुकूलित ३ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

२) जेंव्हा भोजनाची व नाश्त्याची विनामुल्य सोय असलेल्या कोणत्याही गाडीने प्रवास केला जाईल, तेंव्हा प्रवास कालावधीचा ५०% दैनिक भत्ता कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्ता देयकातून कमी केला जाईल.

तात्काळ आरक्षण शुल्क :- वरील संदर्भ क्रमांक-३ येथील दिनांक ०९.१२.२००५ च्या आदेशातील तात्काळ आरक्षण शुल्कासंबंधीची तरतूद खालील प्रमाणे सुधारण्यात येत आहे.रेल्वेच्या विशिष्ठ गाड्यांसाठी तात्काळ आरक्षण सुविधा आता उपलब्ध झाली आहे. यापुढे अत्यंत तातडीच्या परिस्थितीत कार्यालयीन कामकाजाकरिता प्रवासासाठी आकारल्या जाणाऱ्या तात्काळ आरक्षण शुल्काची प्रतिपूर्ती मुंबई ते दिल्ली, नागपूर व औरंगाबाद येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी रेल्वेचे सर्वसाधारण आरक्षण सेवेद्वारे तिकिट उपलब्ध न झाल्यास तात्काळ आरक्षण सुविधेचा लाभ अनुज्ञेय राहील, मात्र नियंत्रक अधिकाऱ्यांनी प्रवासाची निकड प्रमाणित करणे आवश्यक असेल.

५...

एजन्सी शुल्क :- वरील संदर्भ क्रमांक-३ येथील दिनांक ०९.१२.२००५ च्या आदेशातील याविषयीची तरतूद खालील प्रमाणे सुधारण्यात येत आहे. प्रवास भत्त्यावरील, मुख्यत्वे विमान प्रवासावरील खर्च कमी व्हावा म्हणून ज्या अधिकाऱ्यांना स्वेच्छा निर्णयानुसार किंवा सचिवांच्या पूर्वपरवानगीने विमान प्रवास अनुज्ञेय आहे, अशा अधिकाऱ्यांना यापुढे आरक्षणासाठी रेल्वेने परवाना दिलेल्या अधिकृत एजन्सीने आकारलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

२.३ सार्वजनिक वाहनातून खुष्कीच्या मार्गाने प्रवास :-

अ.क्र.	महामंडळाचे कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन	प्रवास भत्त्याची पात्रता
१	२	३
१.	रुपये ६६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी)	वातानुकूलित बससहित इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे.
२.	रुपये ४४००/- व त्याहून अधिक मात्र रुपये ६६००/- पेक्षा कमी.	वातानुकूलित बसखेरीज इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे.
३.	रुपये ४४००/- पेक्षा कमी	सर्वसाधारण सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे.

प्रस्तावना :- राज्यातील अनुसूचित जमातीतील जनतेची आर्थिक उन्नती घडवून आणण्यासाठी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक- २३९६/४५/प्र.क्र.३९/का.३, दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अनुसार, करण्यांत आलेली आहे. सदर महामंडळाची महाराष्ट्र शासनाचा उपक्रम म्हणून कंपनी कायदा १९५६ अन्वये दि.१५.१.१९९९ रोजी नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.१००/-कोटी इतके आहे. त्यातील ५१% हिस्सा राज्यशासनातर्फे देण्यात येणार असून ४९% हिस्सा केंद्र शासनाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल. सन १९९८-९९ या वित्तीय वर्षात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रु.५.०० कोटी इतकी रक्कम भाग भांडवल म्हणून उपलब्ध करण्यांत आलेली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी आवश्यक ती पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव, प्रधान सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ जुलै,१९९९ रोजी झालेल्या दत्ताधिकार समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला. समितीने सदर प्रस्तावाची छाननी करुन असा निर्णय घेतला की, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयासाठी एकूण ३० पदे आणि ठाणे, नाशिक, नंदुरबार, जळगांव, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड आणि अहमदनगर या १२ शाखा कार्यालयासाठी प्रत्येकी १० पदे मंजूर करण्यांत यावीत. या महामंडळासाठी पदे मंजूर करावयाचा प्रस्ताव मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली सचिव समितीपुढे ठेवण्यांत यावा. सदर प्रस्ताव, मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली सचिव समितीपुढे दि.२२.१०.१९९९ रोजी ठेवण्यात आला. सदर बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, शबरी महामंडळासाठी नवीन पदे निर्माण न करता आदिवासी विकास महामंडळाच्या मंजूर १३९१ पदापैकी १५० पदे शबरी महामंडळाकडे वर्ग /

[illegible] १५ डिसेंबर,१९९९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आदिवासी विकास विभागाचा आढावा मंत्रिमंडळाने घेतला. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे आदिवासी विकास महामंडळाकडील अतिरिक्त कर्मचारी समायोजित करून सदर महामंडळ पुढील १०० दिवसात कार्यान्वित करावे असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला.

२. शासन निर्णय :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ पुढील १०० दिवसात कार्यान्वित होण्यासाठी सदर महामंडळासाठी एकूण १५० पदांपैकी पहिल्या टप्प्यात ७२ पदे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकरिता आवश्यक ती पदे निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या आस्थापनेवरील सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये दर्शविलेली एकूण ९३ पदे प्रत्यर्पित करून त्यांच्या समायोजनाच्या पहिला टप्पा म्हणून ७२ नवीन पदे सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. नवीन मंजूर करण्यांत आलेली पदे, सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या किंवा इतर महामंडळाच्या कर्मचारी वर्गामधून भरण्यात यावीत. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, आदिवासी विकास महामंडळाच्या सेवाशर्तीनुसार लागू राहतील.

३. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी पहिला टप्पा म्हणून निर्माण करण्यांत येणाऱ्या ७२ नवीन पदांचा वार्षिक आवर्ती खर्च रु.४२.१६ लाख इतका आणून त्या मोबदल्यात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या आस्थापनेवरील ९३ पदे (रु.४५.१० लाख) प्रत्यर्पित / वर्ग करण्यांत येत असल्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार शासनावर पडणार नाही. तसेच व्यवस्थापकीय संचालकाचे एक पद निर्माण करण्यासाठी (मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे)आदिवासी विकास महामंडळाने रु.३.०३ लाखाची बचत दाखविलेली आहे.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांनी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी रु.४२.१६ लाख इतकी रक्कम वर्ग करावी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक यांनी पुढील व्यवस्था होईपर्यंत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पहावे. तसेच व्यवस्थापकीय संचालकांनी सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडील किंवा इतर महामंडळाकडील कर्मचारी / अधिकारी यांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे परसंतेवर घेण्याचा अधिकार त्यांना देण्यांत येत आहे.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक यांनी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी एकूण १५० पदांपैकी दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ७८ पदे निर्माण करण्यासाठी वरील वार्षिक खर्च येणार आहे तोपर्यंत निधी व पदे वर्ग / समायोजित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

६. हा शासन निर्णय, प्रधान सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दत्ताधिकार समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ज.ल.पावरा)
वनशासन अधिकारी.

प्रत :

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखापरीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी,नाशिक.
आयुक्त, आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य, नाशिक.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.,नाशिक.
व्यवस्थापकीय संचालक, राज्य आदिवासी वित्त व विकास महामंडळ,नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / ठाणे / नागपूर /अमरावती.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सचिव, भारत सरकार, आर्थिक व्यवहार व अर्थसंकल्प मंत्रालय, नवी दिल्ली.
आयुक्त तथा व्यवस्थापकीय संचालक, एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली.
आदिवासी विकास विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
निवड नस्ती (का.३), आदिवासी विकास विभाग.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्रमांक-आविम-१०९९/प्र.क्र.७/ का.३,
दिनांक १३ डिसेंबर,१९९९ चे जोडपत्र.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित., नाशिक या महामंडळाची समर्पित करण्यांत येणारी पदे.

अ.क्र.	पदाचे नांव	वेतनश्रेणी (रुपये)	समर्पित पदांची संख्या	वार्षिक खर्च (रुपये)
१	उपव्यवस्थापक	१६४०- २९००	९	६३३,६३६
२	निरिक्षक	१६४० - २९००	१६	१,१२६,४६४
३	लेखापाल	१६४० - २९००	१	७०,४०४
४	रोखपाल	९५० - १५००	१	४५,७४७
५	लिपिक	९७५ - १६६०	४९	२,०६९,१७२
६	वाहनचालक	९५० -१५००	१	४१,६२८
७	शिपाई	७५० - ९४०	१६	५२२,८१६
	एकूण		९३	४,५०९,८६७

परिशिष्ट "ब"

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक- आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३,
दिनांक १३ डिसेंबर,१९९९ चे जोडपत्र.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी पहिला टप्पा म्हणून नव्याने मंजूर केलेली ७२ पदे.

अ.क्र.	पदाचे नांव	मंजूर पद संख्या	वेतनश्रेणी (रुपये)	मुख्य कार्यालय नाशिक	जिल्हा / शाखा कार्यालय	एकूण पदे (५+६)
१	२	३	४	५	६	७
१	व्यवस्थापक	१३	२०००-३५००	१	१२ (प्रत्येकी एक)	१३
२	उपव्यवस्थापक	१	१६४०-२९००	१	-	१
३	लेखापाल	१३	१६४०-२९००	१	१२ (प्रत्येकी एक)	१३
४	निरिक्षक	१२	१६४०-२९००	-	१२ (प्रत्येकी एक)	१२
५	लघुटंकलेखक	१	१२००-२०४०	१	-	१
६	वरिष्ठ सहाय्यक	२	१२००-२०४०	२	-	२
७	रोखपाल	१	१५०-१५००	१	-	१
८	लिपिक-नि-संगणक सहाय्यक	१४	१७५-१६६०	२	१२ (प्रत्येकी एक)	१४
९	वाहनचालक	१	१५०-१५००	१	-	१
१०	शिपाई	१४	७५०-१४०	२	१२ (प्रत्येकी एक)	१४
	एकूण	७२	-	१२	६० (प्रत्येक ५ पदे)	७२

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास
महामंडळ, नाशिक यांच्या कार्यालयात
"रोष्टर" पध्दती लागू करणे बाबत.....

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र. टिएसए-१०८६/सीआर-५४/का-१, कार्यासन
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

M. D.
T. D. C.

दिनांक : ११ मे, १९८७.

वाचा : १] व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे -
१] पत्र क्र. आविम/प्रशासन-१/रो-प/५७९८/१९८६, दि. १८-४-८६,
२] पत्र क्र. आविम/प्रशासन-१/रो-प/६०१६/१९८६, दि. २३-४-८६.
२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:बीसीसी/१०८२/१७७७/१६-ब, दिनांक ६ जानेवारी, १९८३.
३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:बीसीसी-१०७२/जे, दिनांक : ६ जून, १९७२.
४] शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्रमांक: सिएसएम-१३७७/३५७५६/दिनांक १८-४-१९८६.

शासन निर्णय : महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना शासनाने १९७२ साली केली. "आदिवासी" हा समाजाचा अत्यंतिक मागासलेला घटक हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून, आदिवासी शेतक-याला, मजुराला, खाजगी व्यापा-यांच्या आर्थिक पिळवणुकीमधून वसमाजकंठकांच्या सामाजिक हाल-अपेष्टांतून त्यांची सोडवणूक करण्यासाठी शासनाने १९७५ ला जो आदिवासींसाठी आर्थिक सुधारणा कायदा संमत केला त्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, महामंडळामार्फत आदिवासींच्या हितासाठी विविध योजना राबविण्याचे ठरविण्यात येवून त्याची कार्यवाही सुरु झाली. अशा प्रकारे आदिवासींच्या हितासाठी स्थापन झालेल्या या आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक- १८ एप्रिल, १९७२ च्या त्यावेळचे भूतपूर्व मा. मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत असा ठराव मंजूर केला की, आदिवासी विकास महामंडळात शेकडा ९० टक्के आदिवासी कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यात याव्यात. या ठरावाला अधिनस्त राहून याच महामंडळाच्या संचालक मंडळाने परत दिनांक ८ फेब्रुवारी, १९८६ रोजी झालेल्या बैठकीत असा ठराव केला की, "दिनांक १८ एप्रिल, १९७२ च्या सभेत पारित झालेल्या ठराव क्रमांक-१२ ची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होणसाठी व आदिवासी कर्मचा-यांचे

महा. रा. सह. आ. वि. महा. नाशिक-१
आवक क्र. ९२७६५ दिनांक २५/५/८७

मागे पहा....

हितसंबंध अबाधित राखण्यासाठी शासकीय कर्मचा-यांसाठी प्रचलित असलेली "रोष्टर" पध्दती पदोन्नतीसाठी महामंडळाच्या अधिस्त कर्मचा-यांना लागू करण्यांत येऊ नये."

२. वरील प्रकारे ठराव करून तो शासनाकडे मंजुरीकरिता पाठविण्यांत आला. असता शासनाने त्यावर सखोल विचार केला. आदिवासी विकास महामंडळाची स्थापना ही प्रामुख्याने आदिवासींच्या हितासाठी आहे तसेच त्या महामंडळात आदिवासी कर्मचाऱ्यांना नोकरी व्यवसायाला प्राधान्य मिळण्याच्या दृष्टीकोनातून आदिवासी विकास महामंडळाने १९७२ पासून ते आतापर्यंत आदिवासी कर्मचा-यांची भरपूर प्रमाणांत भरती केली. तरीही बाब शासनाने विचारात घेतली. : त्याच बरोबर, जरी-आदिवासी विकास महामंडळ हे आदिवासी बांधवांच्या विकासा-करिता असेल, तरी इतर मागासवर्गीय कर्मचा-यांवर त्यांच्या नियुक्ती, बढतीमुळे यापुढे अन्याय होणार नाही याबाबी शासनाने विचार केला. कारण शासनाने "रोष्टर" पध्दती लागू करण्याचा निर्णय हा सर्व सरकारी व निम सरकारी कार्यालयांकरता घेतला असल्यामुळे त्याकडेही तो विचार करणेत आला. त्यामुळे विचारांती, आदिवासी कर्मचा-यांचे तसेच मागासवर्गीय कर्मचा-यांचे हित नजरेसमोर ठेवून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, आतापर्यंत आदिवासी विकास महामंडळांत आदिवासींची भरती पुरेशा प्रमाणात झाली आहे. यापुढे प्रस्तुत मंडळात सरळ सेवा प्रवेशाने अथवा पदोन्नतीने नियुक्ती करते वेळी "रोष्टर" पध्दती लागू करण्यांत यावी. रोष्टर पध्दती बाबत शासनाचे आणि विशेषत: सामान्य प्रशासन विभागाचे जे जे आदेश असतील ते यापुढे आदिवासी विकास महामंडळाकडून तंतोतंत पाळले जावेत. मात्र या रोष्टर पध्दती लागू करण्याचा पूर्वी प्रभाव देण्यांत येवू नये म्हणजेच ही रोष्टर पध्दती कर्मचा-यांच्या नियुक्ती/बढतीच्या संबंधात हे शासनाचे आदेश ज्या तारखेला निर्गमित झाले आहेत त्या दिवसापासून महामंडळाला लागू करणेत यावी. [म्हणजेच दि. २१ मे, १९८७ पासून].

३. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व सल्याने निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ज. ल. पिंपळे)
उप सचिव.

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सरकारी आदिवासी

क्र.अस्था/२/ / ०५/

ना.शि.क्र. १...

दिनांक :- ८ नोव्हेंबर,१९८५...

प्रति,

प्रादेशिक व्यवस्थापक,

म.राज्य सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.

प्रादेशिक कार्यालय,पुणे...

विषय :- परिवेक्षा कालावधी संपविणे बाबत...

संदर्भ :- आपले पत्र क्र.अस्था/८५/८६/३०३१/
दिनांक ३०/१०/८५...

वरील संदर्भीय पत्रान्वये आपण आपले अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचारी वृंद यांचा परिवेक्षा कालावधी संपविणे बाबद कळविले आहे. परंतु प्रधान कार्यालयाचे पत्र क्र.आविम/अस्था/२/२९१३/८५ दिनांक १७/१०/८५ चे परिपत्रक अवलोकन करावे व त्याप्रमाणे प्रस्ताव पुन्हा सादर करावा.

प्रस्ताव सादर करताना पुढील पूर्तता अवश्यक आहे.

(१) कर्मचारी नेमणूक आदेश सत्यप्रत.

(२) कर्मचारी हजर रिपोर्ट सत्यप्रत.

(३) परिवेक्षा कालावधीत अर्जित/अनार्जित व वैद्यकिय रजा घेतलेल्या कालावधी.

(४) प्रादेशिक व्यवस्थापक व उप प्रादेशिक व्यवस्थापक यांचा सदर कर्मचारी कामाचा अहवाल.

(५) वरील प्रमाणे पूर्तता करून परिपत्रकान्वये पुन्हा प्रस्ताव सादर करावा म्हणजे पुढील कार्यवाही करता येईल. आपण पाठविलेला प्रस्ताव व परिपत्रकाची एक प्रत पुन्हा पाठविण्यात येत आहे. तरी सदर परिपत्रकाचे अवलोकन करून प्रस्ताव पाठवावा.

व्यवस्थापकीय संचालक,

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.

ना.शि.क्र. १... करिता...

क. आस्था/५५५ / १९८१
महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी
विकास महामंडळ मर्यादीत, पुणे -३०
दिनांक - १०/३/१९८१

विषय : वार्षिक वेतनवाढ देणेबाबत

प रि प त्र क :

१. महामंडळाच्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवा नियमाप्रमाणे त्यांच्या वेतन श्रेणीतील वार्षिक वेतनवाढ देण्याबाबतची तरतूद आहे. संचालक मंडळाच्या दिनांक १४/२/१९८१ च्या सभेतील ठराव क्र. ३२ अन्वये कर्मचा-यांच्या सेवानियम २२[ड] मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

" कर्मचा-याने आपला परिवेक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यावर आणि नियम २१ प्रमाणे परिवेक्षा कालावधी संपविल्या संबंधीच्या लेखी आदेशान्वये वेतन श्रेणीतील वार्षिक वेतनवाढ कर्मचा-यांना देण्यात येईल. [वेतनवाढीची मुदत तो कर्मचारी ज्या तारखेपासून त्या वेतनश्रेणीत लागला असेल त्या तारखेपासून मोजण्यात येईल. तथापि परिवेक्षा कालावधीत जर एखाद्या कर्मचा-याने हक्काची अगर इतर अर्जित रजा घेतली असल्यास सदर रजेच्या कालावधीप्रमाणे वेतनवाढीची तारीख पुढे ढकलण्यात यावी.

कर्मचारी वरीलप्रमाणे वेतनवाढीस पात्र राहील."

२. तरी सर्व प्रादेशिक व्यवस्थापकांनी सेवा नियमामध्ये झालेल्या वरील दुरुस्तीची नोंद घेवून त्याप्रमाणे सत्वर कार्यवाही करावी. त्यांच्या अधिकार कक्षेत [ज्यांची नियुक्ती त्यांनी केली असे] येणा-या कर्मचा-यांचा परिवेक्षा कालावधी वाढविण्याबाबत अथवा संपुष्टात आणण्याबाबत योग्य तो निर्णय घेवून त्याप्रमाणे या कार्यालयास माहितीकरीता [यादीसह] कळवावे. तसेच त्यांचे अधिकार क्षेत्रात येत नसलेल्या कर्मचा-यांबाबत परिवेक्षा कालावधी संपुष्टात आणण्याबाबत अथवा वाढविण्याबाबत सविस्तर लेखी अहवाल सत्वर पाठवावा.

व्यवस्थापकीय संचालक
म. राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ
मर्यादीत, पुणे

सर्व प्रादेशिक व्यवस्थापक
सर्व शाखाप्रमुख, मुख्यालय, पुणे

(४) महामंडळाचे विशेष श्रेणीचे Special Grade अधिकारी त्यांना बडतर्फ अगर कमी करणेची कारवाई वगळतां, त्यांचेविरुध्द इतर प्रकारची प्रशासकीय कारवाई करणे तसेच महामंडळाचे इतर सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे व त्यांना बडतर्फ अगर कमी करणेचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील. तसेच ग्रेड-१ च्या म्हणजे प्रादेशिक व्यवस्थापक या संवर्गातील अधिका-यांपर्यंत ज्यांचे ग्रेडवेतन ५४००/- पर्यंत असलेल्या अगर संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविलेल्या मर्यादेपर्यंत पगार असलेल्या अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार त्यांना असतील. सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेवर व्यवस्थापकीय संचालक यांचे नियंत्रण राहील. महाव्यवस्थापक संवर्गातील अधिकारी की ज्यांच ग्रेडवेतन रुपये दरमहा ६६००/- व त्याचे वर आहे अशांची नेमणूक, त्यांची बडतर्फी अगर कमी करणे या बाबी सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने केल्या जातील.

(५) व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यांचे अधिकार व कर्तव्ये :-

संचालक मंडळ आवश्यकतेनुसार सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कामाचे वाटप ठरावान्वये करेल. मुख्य कार्यकारी अधिकराऱ्यांची नेमणुक किमान अर्हता प्राप्त करीत असलेल्या व्यक्तीची केली जाईल. तो संस्थेचा पूर्णवेळ सेवक असून संचालक मंडळ त्यांचा कामकाजास वेळोवेळी मदत करेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा पदसिध्द सदस्य राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली राहील तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार तो आपले कर्तव्य पार पाडेल.

१. संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर लक्ष ठेवणे.
२. संस्थेच्या वतीने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर सहया करणे.
३. संस्थेच्या वतीने आवश्यक ती सर्व हिशोबाची पुस्तके ठेवणे, आवश्यक ते सर्व रेकार्ड तयार ठेवणे, कायदा, नियम आणि उपविधीनूसार आवश्यक त्याठिकाणी विहित नमुन्यातील विवरण पत्रके दाखल करणे यासंबंधी सर्व योजना करणे.
४. संचालक मंडळ सभा बोलाविणे, सभेचे इतिवृत्त तयार करणे.

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीआरएफ-२००२/प्र. क्र. १३/१२, दि. ०६ ऑगस्ट, २००२
२) मु. का. नाशिक आदेश क्र. आविम/प्रशा/अस्था-२/१८४४/२००६, दि. ०८ फेब्रुवारी, २००६.
३) मु. का. नाशिक आदेश क्र. आविम/प्रशा/अस्था-१/२६७२/२०१५, दि. ०५ सप्टेंबर, २०१५.
४) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रं. वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि.२२ एप्रिल, २००९
५) मु. का. नाशिक आदेश क्र. आविम/प्रशा/अस्था-२/१८९७/२००५, दि. २३ फेब्रुवारी, २००५.
६) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.एसआरव्ही-०५/२८३/प्र.क्र.२१/०५/१२, दि. २७ मे, २००५.
७) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.एसआरव्ही-०५/२८३/प्र.क्र.२१/०५/१२, दि. २७ जुलै, २००५.
८) आदिवासी विकास विभाग,परिपत्रक क्रं आस्था-१७०१/प्र.क्र.११४/भाग-३/का-१५ दि.०९ नोव्हेंबर २००५

जा.क्र.आविम/प्रशा/आस्था-१/ २२ /२०१७
ना शि क :-२ दिनांक ०१ एप्रिल, २०१७

परिपत्रक

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.०९ मार्च, १९९० नुसार घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त भागात (अनुसूचित क्षेत्र) काम करणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकस्तर पदोन्नतीचा लाभ विहीत अटी व शर्तीस अधिन राहुन या कार्यालयाचे संदर्भ क्रं. २ व ३ चे आदेशान्वये लागु करण्यात आलेला आहे. मुख्य कार्यालयाकडील संदर्भिय आदेशांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. दि.०९ मार्च, १९९० च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात व शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त भागात (अनुसूचित क्षेत्र) काम करणा-या अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भ क्रं. ४ चे शासन परिपत्रकातील वेतनबँड नियम क्रं. ८ नुसार जोडपत्र III मधील सुधारीत वेतनश्रेणीनुसार एकस्तर योजनेचा लाभ मंजुर करण्यात येत आहे.
२. संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांस जादा रकमेची अदायगी करण्यात आलेली असल्यास तसेच लेखापरीक्षणाच्या अगर कोणत्याही तपासणीत अतिप्रदान आढळुन आल्यास सदर रक्कमेची एकरकमी वसुली संबंधिताच्या मासिक वेतनातुन करण्यात यावी.
३. प्रादेशिक व्यवस्थापक यांनी त्यांचे अधिनस्त कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर योजना लागु केलेली असल्यास तसेच या योजनेअंतर्गत जादा रक्कमेची अदायगी करण्यात आलेली असल्यास अशा कर्मचाऱ्यांचे वेतनातुन समान पाच हफ्त्यात सदर रक्कमेची वसुली करावी.
४. महामंडळातील ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर करण्यात आलेला आहे त्यांना आणखी वरीष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच अधिकारी / कर्मचारी एकस्तर योजनेकरीता पात्र असतील त्यांचेबाबत शासन निर्णयातील तरतुदी व मुख्यालयाचे आदेशानुसार प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कार्यवाही अनुसरण्यात यावी.
५. एकस्तर पदोन्नती योजनेची अंमलबजावणी करताना संबंधित अधिकारी / कर्मचा-यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. तसे न आढळुन आल्यास एकस्तर वेतनश्रेणी बंद करण्यात येईल. एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ घेत असलेले कर्मचारी प्रत्यक्ष मुख्यालयी राहता वा नाही हे पाहणे व राहत नसल्यास, तात्काळ एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ बंद करणेची जबाबदारी संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांची राहील.

६. एकस्तर पदोन्नतीची योजना संबंधित अधिकारी/कर्मचारी आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातुन बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मुळच्या संवर्गातील वेतनश्रेणीत पुर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल. कार्यालयीन प्रमुखांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र पाठवताना तशा स्पष्ट सुचना नमुद कराव्यात.

७. संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वरीलप्रमाणे अटी व शर्थी मंजुर असल्याचे बंधपत्र दोन प्रतीत सादर करुन कार्यालय प्रमुखांनी एक प्रत संबंधिताचे मुळ सेवापुस्तकात लावुन एक प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.

८. एकस्तर योजननेकरीता पात्र असलेल्या संवर्गनिहाय महामंडळाकडील अधिकारी / कर्मचारी यांची वेतननिश्चिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ (१ ते ३ पृष्ठ) प्रमाणे करण्यात यावी.

(ए.एल.दगडे)
महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.रा.सह.आदिवासी विकास महा.मर्या,
व्यवस्थापकीय संचालक नाशिक करीता

स्थळ प्रतिवर मा.व्य.सं.यांची सही असे.

प्रत :-

१. प्रादेशिक व्यवस्थापक,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
प्रादेशिक कार्यालय, ---------- (सर्व)

२. उपप्रादेशिक व्यवस्थापक,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
उपप्रादेशिक कार्यालय, ---------- (सर्व)

३. महाव्यवस्थापक (विपणन/वित्त/गोंडवन),
मुख्य कार्यालय, नाशिक / विभागीय कार्यालय, गोंडवन.

४. वित्त विभाग, मुख्य कार्यालय, नाशिक.

संवर्गनिहाय वेतननिश्चिती परिशिष्ट- अ

पदाचे नाव :- उप प्रादेशिक व्यवस्थापक, व्यवस्थापक (लेखा)

दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.			
१	अधिकारी नांव व पदनाम	**उप प्रादेशिक व्यवस्थापक**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	९३००-३४८००, पी.बी.-२,	९३००-३४८००, पी.बी.-२,
५	देय ग्रेडवेतन	४४००	४५००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	१०९००	१०९००+४६०=११३६०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	१५३००	१५८६०
८.	दि. ---------- रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		११३६० + ४५००

पदाचे नाव :- उपव्यवस्थापक, विपणन निरीक्षक व लेखापाल.

दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.			
१	अधिकारी नांव व पदनाम	**उपव्यवस्थापक, विपणन निरीक्षक व लेखापाल**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	९३००-३४८००, पी.बी.-२,	९३००-३४८००, पी.बी.-२,
५	देय ग्रेडवेतन	४३००	४४००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	१०१००	१०१००+४४०=१०५४०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	१४४००	१४९४०
८.	दि. ---------- रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		१०५४० + ४४००

पदाचे नाव :- सहाय्यक व्यवस्थापक.

दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.			
१	अधिकारी नांव व पदनाम	**सहाय्यक व्यवस्थापक**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	९३००-३४८००, पी.बी.-२,	९३००-३४८००, पी.बी.-२,
५	देय ग्रेडवेतन	४२००	४३००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	९३००	९३००+४१०=९७१०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	१३५००	१४०१०
८.	दि. ---------- रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		९७१० + ४३००

पदाचे नाव :- वरिष्ठ सहाय्यक व वीजतंत्री

	दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.		
१	अधिकारी नांव व पदनाम	**वरिष्ठ सहाय्यक व वीजतंत्री**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	५२००-२०२००, पी.बी.-१,	५२००-२०२००, पी.बी.-१,
५	देय ग्रेडवेतन	२४००	२५००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	७५१०	७५१०+३००=७८१०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	९९१०	१०३१०
८.	दि. ----------रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		७८१० + २५००

पदाचे नाव :- कनिष्ठ सहाय्यक, टंकलिपीक, प्रतवारीकार, गोदामपाल, वाहनचालक (जीप/ट्रक)

	दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.		
१	अधिकारी नांव व पदनाम	**कनिष्ठ सहाय्यक, टंकलिपीक प्रतवारीकार, गोदामपाल, वाहनचालक (जीप/ट्रक)**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	५२००-२०२००, पी.बी.-१,	५२००-२०२००, पी.बी.-१,
५	देय ग्रेडवेतन	१९००	२०००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	५८३०	५८३०+२४०=६०७०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	७७३०	८०७०
८.	दि. --------- रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		६०७० + २०००

पदाचे नाव :- वाहनचालक (ट्रक्टर)

	दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.		
१	अधिकारी नांव व पदनाम	**वाहनचालक (ट्रक्टर)**	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	५२००-२०२००, पी.बी.-१,	५२००-२०२००, पी.बी.-१,
५	देय ग्रेडवेतन	२०००	२१००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	५८३०	५८३०+२४०=६०७०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	७८३०	८१७०
८.	दि. --------- रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		६०७० + २०००

पदाचे नाव :- शिपाई, रखवालदार व क्लिनर.

	दिनांक ०१.०१.२००६ किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-याचे वेतननिश्चितीचे विवरणपत्र.		
१	अधिकारी नांव व पदनाम	शिपाई, रखवालदार व क्लिनर	
२	तपशिल	एकस्तर नसतांना केलेली वेतननिश्चिती	एकस्तर लागु करावयाची वेतननिश्चिती
३	सेवेत रुजू दिनांक	दिनांक -	दिनांक -
४	सुधारीत वेतनश्रेणी	४४४०-७४४०, पी.बी.-१,	४४४०-७४४०, पी.बी.-१,
५	देय ग्रेडवेतन	एस.१३००	एस. १४००
६	वेतन बँड मधील वेतन (पहा नियमाच्या जोडपत्र-३ मधील तक्ता ३)	४४४०	४४४०+१८०=४६२०
७	वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (अ. नं. ५ + ६)	५७४०	६०२०
८.	दि. २९.०१.२०१३ रोजीचे (एकस्तर पदोन्नती पदाचे) वेतन बँड व ग्रेडवेतन		४६२० + १४००

(ए.एल.दगडे)
महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.रा.सह.आदिवासी विकास महा.मर्या,
व्यवस्थापकीय संचालक नाशिक करीता

स्थळ प्रतिवर मा.व्य.सं.यांची सही असे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक.

नियमित वेतनश्रेणीतील अधिकारी / कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय, क्रमांक-आस्था-२०१०/प्र.क्र.२२२/(संदर्भ क्र.२३४५/०९) का.१

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,दिनांक : ३१ मे, २०१०.

वाचा :- १) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक-टिएसए-१०८६/प्र.क्र.२४ का.३ दिनांक १२ मे,१९८६.

२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक-आविम-१०९६/प्र.क्र.९९ का.३ दिनांक १० जानेवारी, १९९७.

३) शासन अधिसूचना वित्त विभाग, क्रमांक-वेपूर-१२०९/ प्र.क्र.२७/ सेवा-९. दिनांक २२ एप्रिल,२००९.

४) शासन निर्णय, वित्तविभाग.क्रमांक-शासाऊ-१००९/प्र.क्र.१२१/साऊ, दिनांक १९ डिसेंबर, २००९

५) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांची पत्रे क्रमांक-आविम/ प्रशा/ आस्था-४/०९/सुचेप्र/७९६/०९, दिनांक ७ डिसेंबर, २००९, ५ जानेवारी २०१०, २५ जानेवारी,२०१०, ९फेब्रुवारी,२०१० व २६ एप्रिल,२०१०.

प्रस्तावना :- उपरोल्लेखित अ.क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी आकृतीबंध त्यांच्या पदनिहाय वेतनश्रेणीसह मंजूर करण्यात आला आहे. शासन अधिसुचना वित्त विभाग, क्रमांक-वेपूर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल,२००९ अन्वये राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. तसेच संदर्भित दिनांक १९ डिसेंबर,२००९ च्या शासन निर्णयान्वये काही अटी व शर्तीच्या अधीन राहून राज्यातील सार्वजनिक उपक्रमांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना सुधारित वेतनश्रेणी लागु करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाने उपरोल्लेखित अनुक्रमांक ५ येथील पत्रांन्वये शासनास सादर केला होता व सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय : महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील नियमित अधिकारी/ कर्मचारी यांना (जोडपत्र "अ" प्रमाणे) सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दिनांक ३१/१२/२००९ पासून लागू करण्यास पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- संकिर्ण-१००९/ प्र.क्र.४०/सेवा- ५, दिनांक १३.०५.२००९ तसेच व शासन निर्णय क्रमांक-वाहंभ-१००९/प्र.क्र.८९/सेवा- ५, दिनांक ०५.०४.२०१० मधील तरतूदींच्या मर्यादेत देय स्थानिक पुरक भत्ता, घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता मंजूर करण्यात यावा.

(ब) महामंडळाला सद्या देय असलेले भत्ते शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या भत्यांएवढे मर्यादित ठेवण्यात यावे.

(क) महामंडळाचा महसुली खर्च कमी करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-शासाउ-१००२/प्र.क्र.२७/२००३/साउ, दिनांक १६.६.२००३ नुसार महामंडळातील एकूण पदांचा आढावा महामंडळाने तीन महिन्यांच्या आत घ्यावा व त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय विभागामार्फत (आदिवासी विकास विभाग) उच्चस्तर समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यात यावा.

(ड) राज्य शासनाचे कर्मचारी व अधिकारी यांना लागू असलेले महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ या नियमांच्या आधारे महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वर्तणूक आणि शिस्त व अपिल नियम शासन मान्यतेने तयार करण्यात यावे व ते लागू करण्यात यावे.

(इ) महामंडळाच्या अतिरिक्त/ अनावश्यक ठरणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छा सेवानिवृत्ती योजना शासन मान्यतेने राबविण्यात यावी.

२. या आदेशाच्या कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणी संबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास तो महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत वित्त विभागाच्या सल्ल्याने सोडविण्यात येईल व विभागाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

३. सुधारित वेतनश्रेणीमुळे कर्मचा-यांना अदा करावयाच्या रकमेपोटी येणारा खर्च महामंडळास व्यवस्थापकीय अनुदानापोटी शासनाकडून मिळणा-या निधीतून भागविण्यात यावा. यासाठी अतिरिक्त निधीची मागणी करु नये.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९२/१०/साउ, दिनांक ०३.०५.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संकेतांक क्रमांक २०१००५३११९०४५४००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

प्रकाश का बर्वे

(प्रकाश का बर्वे)
उप सचिव

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री याचे सचिव

जोडपत्र-"अ"

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-आस्था-२०१०/प्र.क्र.२२२/(संदर्भ क्र.२३४५/०९)/का.१.दिनांक :३१ मे, २०१० चे जोडपत्र -"अ"

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक.

अ. क्र.	पदाचे नांव	मंजूर पदे	कार्यरत पदांची संख्या	विद्यमान वेतनश्रेणी (रुपयात)	सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी (रुपयात)	
१	व्यवस्थापकीय संचालक	१	१	भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारीक वेतनश्रेणीतील अधिकारी		
२	महाव्यवस्थापक	४	१	१०६५०-३२५-१५८५०	१५६००-३९१०० -	बीपी-३-६६००
३	वरिष्ठ व्यवस्थापक	१	०	८०००-२७५-१३५००	१५६००-३९१०० -	बीपी-३-५४००
४	प्रादेशिक व्यवस्थापक	९	६	८०००-२७५-१३५००	१५६००-३९१०० -	बीपी-३-५४००
५	उप प्रादेशिक व्यवस्थापक	३२	१६	६५००-२००-१०५००	९३००-३४८००	बीपी-३-४४००
६	व्यवस्थापक	२६	४	६५००-२००-१०५००	९३००-३४८००	बीपी-३-४४००
७	लघुलेखक (उच्चश्रेणी)	१	१	६५००-२००-१०५००	९३००-३४८००	बीपी-३-४४००
८	उपव्यवस्थापक	४७	२५	५५००-१७५-९०००	९३००-३४८००	बीपी-३-४३००
९	विपणन निरिक्षक	१४४	५०	५५००-१७५-९०००	९३००-३४८००	बीपी-३-४३००
१०	लेखापाल	५७	३१	५५००-१७५-९०००	९३००-३४८००	बीपी-३-४३००
११	अंतर्गत लेखापरिक्षक	१०	०	५५००-१७५-९०००	९३००-३४८००	बीपी-३-४३००
१२	लघुलेखक (निम्नश्रेणी)	१	१	५५००-१७५-९०००	९३००-३४८००	बीपी-३-४३००
१३	सहाय्यक व्यवस्थापक	१८	७	५०००-१५०-८०००	९३००-३४८००	बीपी-३-४२००
१४	लघुटंकलेखक	३	३	४०००-१००-६०००	५२००-२०२००	बीपी-१-२४००
१५	वरिष्ठ सहाय्यक	५१	२५	४०००-१००-६०००	५२००-२०२००	बीपी-१-२४००
१६	वीजतंत्री	११	९	४०००-१००-६०००	५२००-२०२००	बीपी-१-२४००

१७	स्वागतिका	१	०	३२००-८५-४९००	५२००-२०२००	बीपी-१-२०००
१८	वाहन पर्यवेक्षक	१	०	३२००-८५-४९००	५२००-२०२००	बीपी-१-२०००
१९	टंकलिपीक	५१	४०	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२०	कनिष्ठ सहाय्यक	११८	१०९	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२१	रोखपाल	४१	४१	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२२	गोदामपाल	८०	५४	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२३	प्रतवारीकार	३६५	२७०	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२४	विक्रेता तथा लिपीक	२०	२०	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२५	वाहन चालक (जीप)	४५	४०	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२६	वाहन चालक (ट्रक)	७	५	३०५०-७५-३९५०-८०-४५९०	५२००-२०२००	बीपी-१-१९००
२७	वाहन चालक (ट्रॅक्टर)	२२	५	३२००-८५-४९००	५२००-२०२००	बीपी-१-२०००
२८	हवालदार	१	०	२६१०-६०-४०००	४४४०-७४४०	बीपी-१-१ए स.-१६००
२९	शिपाई	८५	७१	२५५०-५५-२६६०-६०-३२००	४४४०-७४४०	बीपी-१-१ एक एस १३००
३०	क्लिनर	७	०	२५५०-५५-२६६०-६०-३२००	४४४०-७४४०	बीपी-१-१ एस १३००
३१	रखवालदार	३८	१९	२५५०-५५-२६६०-६०-३२००	४४४०-७४४०	बीपी-१-१ एस १३००
	एकूण पदे	१२९८	८५४			

(प्रकाश का. वर्वे)
उप सचिव

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना देण्यात येणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः आविम-२०११/प्र.क्र.१८०/का.-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

तारीख: २८ नोव्हेंबर, २०१४.

वाचा:-

१) शिक्षण, क्रीडा व सामाजिक न्याय विभाग शासन निर्णय क्र.:-STW १३७१/१०५६८१-J, दि.१४/१/१९७२.

२) सामाजिक न्याय व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.:-TDC १०७७/१३७३३/XXIV(II), दि.६/२/१९८२.

३) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.:-आविम-१०९७/प्र.क्र.६/का.३, दि.१९/३/१९९८.

४) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.:-आविम-२००४/प्र.क्र.१५/का.३, दि.२४/८/२००४.

५) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे पत्र क्र.आविम/प्रशा/अस्था-२/२६१३/११, दि. १/१०/२०११.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक ची निर्मिती संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये सहकार कायदा १९६० अंतर्गत १९७२ मध्ये करण्यात आली. सन १९७७ मध्ये शासनाने महामंडळाची रचना व कामकाज यामध्ये बदल करुन वैयक्तिक सभासदत्व रद्द करुन आदिवासी सहकारी संस्थांना महामंडळाचे सभासद करण्यात आले. सन १९७८ पासून शासन आदेशान्वये विविध योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या अंमलबजावणीसाठी महामंडळास प्रथम १९८६ मध्ये १३३१ पदे व तद्रंतर सन १९९९ मध्ये ६० पदे अशी एकूण १३९१ पदे मंजूर करण्यात आली. सन १९९९ मध्ये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना झाल्यावर वरील पैकी ९३ पदे शबरी महामंडळाकडे वर्ग करण्यात आली असून सध्या आदिवासी विकास महामंडळाकडे १२९८ मंजूर पदे शिल्लक आहेत.

संदर्भ क्र. २ वरील शासन निर्णयान्वये महामंडळास पुढील १० वर्षापर्यंत अथवा महामंडळ स्वावलंबी होईपर्यंत, संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार १९९२ ते २००२ पर्यंत आणि संदर्भ क्र.४ अन्वये सन २०१२ पर्यंत व्यवस्थापकीय अनुदान देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत १० वर्षे म्हणजे सन २०२२ पर्यंत वाढवून मिळावी म्हणून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी संदर्भ क्र.५ वरील पत्रान्वये शासनास विनंती केली होती.

उक्त प्रस्तावास अनुलक्षून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत पुढील १० वर्षे म्हणजेच सन २०२२ पर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास देण्यात येणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत संपलेली असल्यामुळे सदर मुदत पुढील १० वर्षे म्हणजेच सन २०२२ पर्यंत वाढविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. ही मुदत दिनांक १/४/२०१२ ते ३१/३/२०२२ पर्यंत लागू राहील.

२. दिनांक ६/२/१९८२ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार महामंडळाने योजनांच्या अंमलबजावणीतून झालेला नफा शासनास नियमितपणे परत करणे आवश्यक आहे. अन्यथा महामंडळाला प्रशासकीय खर्चासाठी व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येणार नाही.

३. यापूर्वी व्यवस्थापकीय अनुदानास मुदतवाढ देतांना निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमध्ये (दि.१४/१/१९७२, ६/२/१९८२, १९/३/१९९८ व २४/८/२००४ चे शा.नि.) विहित केलेल्या अटींच्या अधिन राहून दि. १/४/२०१२ च्या पुढे १० वर्षे मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. निधीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करुन निधी गुंतवणूकीसंदर्भात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे कसोशीने पालन करण्यात यावे व त्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२९/१४ साउ, दि.१२/९/२०१४ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४११२८१६२३१६५२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DESHPANDE CHANDRASHEKHAR J

Digitally signed by DESHPANDE CHANDRASHEKHAR J
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DESHPANDE CHANDRASHEKHAR J
Date: 2014.12.01 11:48:56 +05'30'

(चं.ज.देशपांडे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक.
२) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३) सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.

प्रशासन विभाग

आस्थापना- १

" प्रशासकीय अधिकार नस्ती"

एकत्रित माहिती.

TANAJI/ASTAH-1

वाचा :- जा.क्र.आविम/प्रशा/अस्था-१/३३७४/२०१२ नाशिक-२ दिनांक. २९ ऑक्टोबर, २०१२

जा.क्र.आविम/प्रशा/अस्था-१/ ३५३० /२०१५
नाशिक-२
दिनांक- २८ जानेवारी, २०१५

आदेश

कामकाजात सुसूत्रता आणणेच्या दृष्टीने प्रशासकीय अधिकार प्रदान संदर्भात यापुर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश या आदेशान्वये रद्द करण्यात येत असुन, सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ नुसार सुधारीत प्रशासकीय अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

हा आदेश दिनांक ०१.०१.२०१५ पासुन पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहील.

स्थळ प्रतीवर मा.व्य.सं.यांची स्वाक्षरी असे.

व्यवस्थापकीय संचालक
म. रा. सह.आदि. विकास महामंडळ मर्या.,
ना शि क करीता.

प्रत-

१. महाव्यस्थापक (प्रशासन/विपणन/वित्त/गोंडवन),
मुख्य कार्यालय, नाशिक / विभागीय कार्यालय, नागपुर.
२. प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, ----------
३. उप प्रादेशिक व्यवस्थापक, उप प्रादेशिक कार्यालय, ----------

परिशिष्ट - अ.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२.

प्रदान केलेले प्रशासकीय अधिकार.

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
१	प्रवास दैनंदिनी मंजुर करणे	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक यांच्या दैनंदिनी मंजुर करणे बाबतचे पुर्ण अधिकार.	महाराष्ट्र राज्य नागरी सेवानियमानुसार.
		महाव्यवस्थापक (प्रशासन)	सर्व प्रादेशिक व्यवस्थापक यांचे बाबतीत व मुख्यालयातील अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार	---,,---
		महाव्यवस्थापक (वित्त/विपणन)	मुख्यालयातील सर्व अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		प्रादेशिक व्यवस्थापक	विभागांतर्गत असलेले उप प्रादेशिक व्यवस्थापक व प्रादेशिक कार्यालयातील अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		उप प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त विपणन निरीक्षक व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
२	अर्जित, वैद्यकीय व बाळंतपणाची रजा	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यबस्थापक, सर्व प्रादेशिक व्यवस्थापक व मुख्य कार्यालयातील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी व सहयाद्री विभागातील प्रा. का. व उप प्रा. का. स्तरावरील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
	अर्जित, वैद्यकीय व बाळंतपणाची रजा	महाव्यवस्थापक (गोंडवन)	महाव्यवस्थापक, नागपुर यांनी गोंडवन कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी तसेच गोंडवन विभागातील प्रा. का. व उप प्रा. का. स्तरावरील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत अधिकार	---,,---
		प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले सर्व वर्ग-३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार व शबरी कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी	---,,---
२ (अ)	विशेष बिनपगारी रजा	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक, सर्व प्रादेशिक व्यवस्थापक व मुख्य कार्यालयातील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी व सहयाद्री विभागातील प्रा. का. व उप प्रा. का. स्तरावरील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी तसेच गोंडवन विभागातील प्रा. का. व उप प्रा. का. स्तरावरील वर्ग-२ चे अधिकारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत पुर्ण अधिकार.	---,,---
		प्रादेशिक व्यवस्थापक	प्रा. का. अंतर्गत असलेले सर्व वर्ग-३ व ४ मधील कर्मचारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत अधिकार व शबरी कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी एक महिन्यापर्यंत.	---,,---

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
३	किरकोळ रजा	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक व सर्व प्रादेशिक व्यवस्थापक यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (प्रशासन/विपणन/वित्त)	संबंधित शाखेतील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		प्रादेशिक व्यवस्थापक	उप प्रा. व्य. व प्रादेशिक कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार व शबरी कार्यालयातील सर्व कर्मचारी.	---,,---
		उप प्रादेशिक व्यवस्थापक	उप प्रादेशिक कार्यालय अंतर्गत सर्व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
४	नियमित वार्षिक वेतनवाढ	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक व सर्व प्रादेशिक व्यवस्थापक यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
		प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालय व उप प्रा. का. अंतर्गत असलेले वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार व शबरी कार्यालयातल सर्व कर्मचारी.	---,,---

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
५.	अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द खालीलप्रमाणे प्रशासकीय कारवाई करणे.			
	१) कारणे दाखवा नोटीस बजावणे.	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, उप प्रादेशिक व्यवस्थापक, व्यवस्थापक (प्रशासन/वित्त/विपणन) व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	---,,---	महाव्यवस्थापक (प्रशासन/विपणन/वित्त)	मुख्यालयातील अधिनिस्त सर्व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार तसेच सर्व क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	१) कारणे दाखवा नोटीस बजावणे.	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन विभागातील अधिनिस्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	---,,---	प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त सर्व उप प्रादेशिक व्यवस्थापक व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार व शबरी कार्यालयातील सर्व कर्मचारी.	---,,---
	---,,---	उप प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त सर्व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	२) ताकीद देणे.	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, उप प्रादेशिक व्यवस्थापक, व्यवस्थापक (प्रशासन/वित्त/विपणन) व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	---,,---	महाव्यवस्थापक (प्रशासन/विपणन/वित्त)	मुख्यालयातील व क्षेत्रिय अधिनिस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---
	---,,---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन विभागातील अधिनिस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	---,,---

क्र. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त सर्व उप प्रादेशिक व्यवस्थापक व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार व शबरी कार्यालयातील सर्व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	--- ,, ---	उप प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त सर्व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	३) रजा बिनपगारी करणे	व्यवस्थापकीय संचालक	सर्व महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, उप प्रादेशिक व्यवस्थापक, व्यवस्थापक (प्रशासन/वित्त/विपणन) व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत.	--- ,, ---
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन विभागातील वर्ग-२, ३ व ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत.	--- ,, ---
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	अधिनिस्त वर्ग-३ व ४ चे कर्मचारी व शबरी कार्यालयातील कर्मचारी यांचे बाबतीत एक महिन्यापर्यंत.	--- ,, ---
	४) महामंडळाचे झालेले आर्थिक नुकसान पगारातुन वसुल करणे.	व्यवस्थापकीय संचालक	महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
	५) रुपये ५०/- पर्यंत दंड भरणे.	व्यवस्थापकीय संचालक	महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले वर्ग-४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	६) वार्षिक वेतनवाढ रोखणे.	व्यवस्थापकीय संचालक	महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग-४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले वर्ग-४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - ,, - - -

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
	७) निलंबीत करणे व आरोपपत्र ठेवणे	व्यवस्थापकीय संचालक	महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	महामंडळाचे सवानियमानुसार
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	विभागीय कार्यालय, नागपुर वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	८) खालेनिहाय चौकशीसाठी अधिकारी नेमणे.	व्यवस्थापकीय संचालक	महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	महामंडळाचे सवानियमानुसार
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	- - - , , - - -
	९) सेवेतुन बडतर्फ करणे, कमी करणे, सक्तीने सेवानिवृत्त करणे.	व्यवस्थापकीय संचालक	पोटनियम क्रमांक ६२ नुसार महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	महामंडळाचे सवानियमानुसार
६.	कर्मचा-यांच्या बदल्या करणे.	व्यवस्थापकीय संचालक	वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	वेळोवेळी ठरवुन दिलेल्या नियमानुसार.
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन विभागातील वर्ग-४ चे कर्मचारी यांच्या गोंडवन विभागांतर्गत बदली बाबतचे अधिकार.	--- ,, ---

अ. नं.	प्रदान करावयाचे अधिकार	अधिकार वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी	प्रदान केलेल्या अधिकाराच्या मर्यादा	अधिकार प्रदानासाठी अटी
	--- ,, ---	प्रादेशिक व्यवस्थापक	संबंधित प्रादेशिक विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या विभागांतर्गत बदली बाबतचे अधिकार.	--- ,, ---
७.	बदलीभत्ता व तदअनुषंगिक अग्रिम तसेच प्रवास अग्रिम मंजुर करणे.	व्यवस्थापकीय संचालक	महाव्यवस्थापक यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	महामंडळाचे सेवानियमानुसार.
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (प्रशासन)	मुख्य कार्यालयातील वर्ग-२ चे अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	--- ,, ---
	--- ,, ---	महाव्यवस्थापक (गोंडवन)	गोंडवन कार्यालयातील वर्ग-२ चे अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतीत पुर्ण अधिकार.	महामंडळाचे सेवानियमानुसार.
